बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक ३१.७.२००१ रोजी सकाळी ११.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष माननीय श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. ह्या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. भा. चं. शहाणे | संचालक |
| ४. | मा. श्री. अ. श. गुप्ता | " |
| ५. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ६. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ७. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ८. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ९. | मा. श्री. वि. श. हुलके | " |
| १०. | मा. श्री. ना. र. जांभकाटे | " |
| ११. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १२. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १३. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १४. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १५. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १६. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १७. | मा. श्री. अ. शं. धार्मीक | " |
| १८. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| १९. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २०. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २१. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |

२२. मा. श्री. अ. ना. पोरेड्डीवार, प्रतिनिधी, म. रा. सह. बँक, मं. मुंबई.
२३. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर.
२४. मा. श्री. बी. व्ही. असवार विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (बँक) नागपूर.
२५. मा. श्री. एल. जी. चोधरी, कर्मचारी प्रतिनिधी
२६. मा. श्री. व्ही. जी. शहाणे "
२७. मा. श्री. ए. एन. चौधरी सरव्यवस्थापक.

- अनुपस्थित -

१. मा. श्री. र. पां. गावंडे संचालक
२. मा. श्री. र. गो. बंग "
३. मा. श्री. अ. य. गुजर "
४. मा. श्री. चं. ल. कोल्हे "
५. मा. श्री. वि. आ. राउत "
६. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर
७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
८. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर.

---

मा. श्री. र. पां. गावंडे, मा. श्री. र. गो. बंग, मा. श्री. अ. य. गुजर, मा. श्री. चं. ल. कोल्हे व मा. श्री. वि. आ. राउत संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार मा. अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहिस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ६ जून २००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सभेत सविस्तर चर्चा होउन, मागील दिनांक ६ जून २००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ६ जून २००७ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. विषयानुषंगाने चर्चा होउन कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचे माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ३ :- सामंजस्य करार (एमओयू.) अंतर्गत सन २००१-२००२ वर्षाकरिता ठरवून दिलेले उद्दिष्ट तसेच उद्दिष्ट पूर्ततेसाठी कृती कार्यक्रमास मंजूरी देणेकरिता दिनांक २५.६.२००१ रोजी करण्यांत आलेल्या सर्क्युलर ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, सामंजस्य करार (एम.ओ.यू.) अंतर्गत सन २००१-२००२ वर्षाकरिता उद्दिष्टे निश्चित करण्याकरिता दिनांक १८.६.२००१ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथे आयोजीत केलेल्या सभेत मागील ३ वर्षाची उद्दिष्टे/पूर्तता तसेच ३ वर्षातील वाढ याबाबत आढावा घेण्यात आला आणि सन २००१-२००२ वर्षाकरिता, स्वनिधी, ठेवी, कर्जे, व वसुलीची बाबनिहाय उद्दिष्टे ठरवून देण्यांत आली आहे. सदर कराराची अंमलबजावणी करणेकरिता कालबध्द विकासात्मक कृती कार्यक्रम नाबार्डने पुरस्कृत केला आहे. त्यानुसार बँकेच्या व्यवहारांत वाढ करण्याच्या व कामकाजांत सुधारणा करण्याचा बँकेने प्रयत्न करावयाचा आहे. २००१-२००२ करिता करावयाच्या सामंजस्य करारावर दिनांक ३० जून पूर्वी सह्या आवश्यक असल्यामुळे आणि संचालक मंडळाची सभा नजिकच्या काळांत नसल्यामुळे खालील प्रमाणे सर्क्युलर ठराव दिनांक २५.६.२००१ रोजी घेऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला सादर करण्यांत आला आहे.

- सर्क्युलर ठराव -

सामंजस्य करार (एमओयू) अंतर्गत सन २००१-२००२ वर्षाकरिता नाबार्डने स्वनिधी, ठेवी, कर्जे व वसुलीची बाबनिहाय ठरवून दिलेली उद्दिष्टे आणि सदर उद्दिष्टे पूर्ततेसाठी/कराराची अंमलबजावणीसाठी पुरस्कृत केलेला कालबध्द विकासात्मक कृती कार्यक्रमास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सामंजस्य करारावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे असे ठरले."

वरील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ :- दि महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या. मुंबई कडून फेरकर्ज मर्यादेवर रूपये ८००.०० लाखाची उचल करण्याकरिता दिनांक २७.६.२००१ रोजी करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने सविस्तर चर्चा होऊन दिनांक २८.६.२००१ रोजी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित मुंबईकडून फेरकर्ज मर्यादेवर रुपये ८००.०० लाखाची उचल करणेकरिता करण्यांत आलेला सक्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सन २०००-२००१ (जून २००१) वर्षाकरिता परिपत्रक क्रमांक सीएफए/ओपीआर/एफ-23/११४१ दिनांक २२.१२.२००० नुसार अल्पमुदती कर्ज मर्यादा रुपये २०००.०० लाख मंजूर झाली आहे. या मर्यादेवर दिनांक २६.५.२००१ ला रुपये १२००.०० लाखाची उचल करण्यांत आली आहे उर्वरित रुपये ८००.०० लाखाची उचल दिनांक ३०.६.२००१ पर्यंत करावयाची आहे. ३०.६.२००१ पर्यंत संचालक मंडळाची सभा नसल्याने व ठराव आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्प मुदती पीक कर्ज मर्यादेवर रुपये ८००.०० लाखाची उचल करणेकरिता दिनांक २८.६.२००१ रोजी खालील प्रमाणे इंग्रजीत सक्युलर ठराव करण्यांत आला.

## - CIRCULAR RESOLUTION -

'Resolved that the terms and conditions laid down by the Maharashtra State Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/1141/2000-2001, dated 22 December 2000 for the SAO credit limit of Rs. 2000.00 lakhs (Rs. Two thousand lakhs) only sanctioned to this bank for financing seasonal agricultural operations under pooled Rate Scheme for the year 2000-2001 be and are hereby accepted and resolved to take remaining drawals of Rs. 800.00 lakhs.

Further, resolved that any one of the following office bearers from Group 'A' alongwith any one officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 2000.00 lakhs only sanctioned for short term seasonal Agricultural credit limit for the year 2000-2001.

Further, resolved that any one of the office bearers Group "A" alongwith any one from the following officer from Group 'B' are hereby authourised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd, Nagpur creating first charge on the pronotes on behalf

of the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of the bank in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this bank.

1.) Chairman } Group "A"
2.) Vice chairman } Group "A"
3.) General Manager — Group "B"

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- मे. मुरली ॲग्रो प्रॉडक्टस लि, नागपूर यांना मशिनरी खरेदी-करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, मुंबई येथून एल॰सी॰सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक १५.६.२००१ ला करण्यांत आलेला सक्युलर ठराव कायम करणे

ठराव क्रमांक ५ :- मे. मुरली ॲग्रो प्राडक्टस लि, यांना परदेशातून मशिनरी खरेदीसाठी एल॰सी॰ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक १५.६.२००१ रोजी खालिल प्रमाणे करण्यांत आलेला सक्युलर ठराव कायम करण्यांत येत आहे.

- सक्युलर ठराव -

"मे. मुरली ॲग्रो प्राडक्टस लि, नागपूर ला मौजा वडोदा, तालुका कामठी येथे नविन न्युज प्रिंट ॲंड पेपर युनिट उभारणी करिता स्विडन येथून मशिनरी आयात करावयाची आहे. या मशिनरीचे एकूण किंमतीचे २५% प्रमाणे रकमेचे पेमेंट कंपनीने मशिनरी पुरवठा करणाऱ्या कंपनीला केलेले असून कंपनीने उर्वरित ७५% पेमेंट करिता कंपनीला एल॰सी॰ ची आवश्यकता असून कंपनीने आपल्या बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई येथून ही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बँकेला विनंती केली आहे.

मे. मुरली ॲग्रो प्राडक्टस लिमिटेड, नागपूर या कंपनीला वरील प्रमाणे पेपर युनिट उभारणी करिता बँकेने रु.८७५.०० लाख मुदती कर्ज मंजूर केलेले आहे. व या मधूनच एल.सी.चे माध्यमातून मशिनरीचे पेमेंट करावयाचे आहे. आयात करावयाची मशिनरी, तिची किंमत, मशिनरीचे उत्पादक व इतर माहिती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठा करणाऱ्या मशिनरी मशिनरी उत्पादकाचे नांव व पत्ता | मशिनरीची एकूण किंमत | २५% ॲडव्हान्सपोटी दिलेली रक्कम | ७५% एलसीद्वारे देय रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १. | जीएल अँड व्ही स्विडन एबी.पी.ओ. बॉक्स १०० एस-१२९-२२-स्टॉकहोम स्विडन | एसईके ९०००००/- रूपये ४२८४०००/- | एसईके २२५०००/- रूपये १०७५०००/- | एसईके ६७५०००/- रूपये ३२९३०००/- |

वरिलप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता कंपनीचे संचालक मंडळाचे सभेत आवश्यक ठराव पारित करून त्याची प्रत तसेच इतर आवश्यक कागदपत्रे कंपनीने अर्जासोबत दिले आहे.

आयात करावयाचे मशिनरीजचे एकुण किंमतीचे ७५% प्रमाणे रक्कम एसईके ६७५०००/- (भारतीय चलनांत मुल्य रूपये ३२९३०००/-) एवढ्या रकमेची एलसी. कंपनीला उपलब्ध करून द्यावयाची असल्याने या रकमेच्या ११०% प्रमाणे रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला तावडतोब उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने या रकमेच्या उपलब्धते बाबतची हमी आपल्या बँकेला तावडतोब उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने या रकमेच्या राज्य सहकारी बँकेला द्यावी लागेल व त्याकरिता मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील आपल्या बँकेचे चालू ठेव खात्यातून एलसी. पोटी ही रक्कम अदा करण्याबाबत राज्य सहकारी बँकेला अधिकार द्यावे लागतील. व याकरिता आपल्या बँकेच्या मा. संचालक मंडळाने ठराव पारित करणे आवश्यक आहे.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा तत्काळ बोलाविणे शक्य नसल्याने मे. मुरली ॲग्रो प्रॉडक्टस लि. नागपूरची तातडीची गरज विचारांत घेउन खालील प्रमाणे सर्क्युलेटींग ठराव करण्यांत आला आहे.

Resolved that -

1. At the request of M/s. Murli Agro Products Ltd. Nagpur a joint and several guarantee be issued in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd, Mumbai against the documentary credit to be issued by the letter for the rupees equivalent of SEK 675000/- in favour of GL & V Sweeden AB, at the rate of exchange applicable for retirement of bills there under.

2. The Maharashtra State Cooperative Bank Ltd, Mumbai is authorised to debit Current account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3. Any two of the following persons are authorised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri B.C. Shahane | Director |
| 2. | Shri R.V. Nimje | Director |
| 3. | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 4. | Shri S.S. Gode | Manager (officg.) |

4. Anyone of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the credit.

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 2 | Shri S.S. Gode | Manager (officg.) |
| 3 | Shri S.B. Nikam | Chief officer (officg.) |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ :- रिकंसिलिएशनची प्रलंबीत कामे करण्यासाठी आर.सी. सेल करिता तसेच एमओयु सेल करिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून एकत्रित पगारमानावर घेण्यांत आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचा कालावधी संपल्याने त्यांच्या सेवा दिनांक ३१ डिसेंबर २००१ पर्यंत वाढविल्याबाबत सभेला माहिती देणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत रिकंसीलिएशनची प्रलंबीत कामे पूर्ण करून अद्यावत ठेवणे करिता आपले बँकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून एकत्रीत पगारमानावर १९९७ पासून तसेच एमओयू सेल करिता १९९८ पासून कर्मचारी घेण्यात आले आहे. या सेलमधील कर्मचारी फार पूर्वीच्या प्रलंबीत नोंदी निकालात काढण्याचे काम करीत आहेत. तसेच जिल्हा परिषद व महाल शाखांचे रिकंसीलिएशन स्टेटमेंट तयार करीत आहेत. बँकेच्या एकूण ८८ शाखांपैकी ११ शाखांचे रिकंसीलिएशनची स्टेटमेंट्स २००० ह्या वर्षातील सुरु आहेत तर उर्वरित ७७ शाखांचे रिकंसीलिएसन स्टेटमेंट्स २००१ पर्यंत अद्यावत प्राप्त झाली आहेत. जून १९९७ पासून आजपर्यंत रुपये ६७.०० कोटीच्या जुन्या १६२६१ प्रलंबीत नोंदी निकालांत काढल्या आहेत. प्रलंबीत नोंदी निकालांत काढून सदरचे कामांत नियमितपणा आणावयाचा असल्याने रिकंसीलिएशन सेलमध्ये तसेच एमओयू. सेल मध्ये काम करणाऱ्या खालील कर्मचाऱ्यांच्या सेवा ३१ डिसेंबर २००१ पर्यंत वाढविण्यांत आल्या आहेत.

रिकंसीलेशन सेलकरिता श्री आर.जी.मांडवकर, श्री.एस.डी.कोट्टे, श्री एस.व्ही. व-हाडपांडे व श्री पी.एफ.दहिकर ह्या ४ सेवानिवृत्त कर्मचारी असून, एमओयू सेल करिता श्री. के.एस.भेंडे हे एक सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन रिकंसीलेशनची कामे अद्यावत आणण्या-साठी आर.सी. सेलकरिता तसेच एमओयू सेल करिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून एकत्रीत पगारमानावर घेण्यांत आलेल्या वरील कर्मचाऱ्यांचा सेवेचा कालावधी दिनांक ३१डिसेंबर २००१पर्यंत वाढविण्यात आल्याबाबत सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ७ :- बँकेच्या दिनांक ३१ जुलै २००१ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभे करिता प्रतिनिधींकडून आलेल्या सुचनांची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ७ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, आज दिनांक ३१.७.२००१ रोजी दुपारी १.०० वाजता बँकेची सन २०००-२००१ची वार्षिक साधारण सभा होत आहे. या सभेस संस्था प्रतिनिधींना विषय पत्रिकेवरील विषयावर अधिकची माहिती अगर स्पष्टीकरण पाहिजे असल्यास त्याची सुचना लेखी स्वरूपात दिनांक २४.७.२००१पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याबाबत बँकेचे सर्व सभासदांना सभेचे नोटिसद्वारे कळविण्यांत आले होते. सदर मुदतीत दोन विणकर संस्थांचे प्रतिनिधींकडून सुचना आल्या आहेत. ह्या सुचना बाबत कार्यालयाने खुलासा तयार केला आहे. सदर खुलासा मा. अध्यक्ष महोदय यांनी आलेल्या सुचना व त्यासंबंधी कार्यालयाने तयार केलेल्या खुलाशाचे सभेसमोर वाचन केले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या दिनांक ३१.७.२००१ रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता प्रतिनिधींकडून आलेल्या सुचनांची व त्या अनुषंगाने बँकेतर्फे करण्यांत आलेल्या खुलाशाची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ८ :- मा. अंकेक्षण पूर्तता उपसमिती सभेत मान्यता दिलेल्या सन १९९९-२००० चे अंकेक्षणावरील बँकेने तयार केलेल्या दोष दुरूस्ती अहवालांत तसेच याच अंकेक्षणावरील मा. राज्य स्तरीय लेखा समितीने मागविलेल्या महत्वाचे बाबीवरील दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१

सहकारी संस्था (बँक), नागपूर यांनी बँकेचे सन १९९९-२०००च्या वर्षाचे अंकेक्षण करून बँकेस पूर्तता करण्यासाठी अंकेक्षण अहवाल बँकेकडे पाठविला. कार्यालयाने १९९९-२०००चे अंकेक्षण अहवालावरील पूर्तता अहवाल तयार केला असून, दिनांक ७.७.२००१ रोजी झालेल्या माननीय अंकेक्षण पूर्तता उपसमितीने मान्यता दिली आहे. तसेच सदर अंकेक्षण अहवालावरील मा. राज्य स्तरीय लेखा समितीने मागविलेल्या महत्वाचे बाबीवरील कार्यालयाने तयार केलेला पूर्तता अहवाल दिनांक ७.७.२००१ रोजीचे मा. अंकेक्षण पूर्तता उपसमितीने मान्यता दिली आहे. सदर पूर्तता अहवाल सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन, सन १९९९-२०००चे अंकेक्षण पूर्तता अहवालास तसेच याच अंकेक्षणावरील मा. राज्य स्तरीय लेखा समितीने मागविलेल्या महत्वाचे बाबीवरील पूर्तता अहवालास मान्यता देण्यांत आली व सदर पूर्तता अहवाल संबधिताकडे वरिष्ठ पाठविण्यांत यावेत असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९ :- माहे जून २००१ अखेर कर्ज वसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ९ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या कर्जवसुली कार्यक्रमाने कर्जवसुली मोहीम राबविण्यात आली. थकबाकीदाराकडून कर्जवसुलीकरिता आठवड्यातून कमीत कमी दोनदा संपर्क साधतां यावा, यासाठी प्रत्येक तालुक्याला एक जीप गाडी देण्यांत आली होती. जिल्ह्यातील अपुऱ्या व अकाली पावसामुळे शेती पिक परिस्थिती समाधानकारक नसतानाही २९ जून २००१ अखेर ३८.९४% कर्ज वसुली झाली आहे मागील वर्षीचे तुलनेत या वर्षीची कर्जवसुली जास्त झाली आहे. व्याज सुध्दा मागील वर्षीपेक्षा जास्त वसूल झाले आहे.

मागील वर्षीचे तुलनेत कर्जवसुली थोडीफार जास्त झाली असली तरी कर्ज वसुली समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. वसुलीवर अधिक भर देण्याबाबत सविस्तर चर्चा होउन २९ जून २००१ अखेरचे कर्ज वसुलीचा आढावा घेण्यांत आला. व याबाबत सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक १०:- बँकेचे चालु वर्षात झालेल्या खरीप पिक कर्जवाटपाचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक १०:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ हंगामातील खरीप कर्जवाटपास १ एप्रिल २००१ पासून सुरुवात झालेली आहे. नाबार्ड व जिल्हा अग्रणी बँक यांचे सहकार्याने सन २००१-०२ ह्या वर्षाकरिता क्रेडीट प्लॅन तयार करण्यांत आला आहे. क्रेडीट प्लॅननुसार खरीप व रब्बी मिळून रुपये ५३.२८ कोटीचे उद्दिष्ट देण्यांत आले आहे व शासनाने रुपये ५७.७४ कोटीचे उद्दिष्ट दिलेले आहे.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांचे तीन वर्षातून एकदा क.म. पत्रके तयार करण्याचे सुचनेनुसार १९९९-२००० मध्ये क.म. पत्रक तयार करण्यांत आलीत. मागील वर्षी ज्या मर्यादा मंजूर करण्यांत आल्या, त्याच मंजुरीच्या आधारावर चालु वर्षी रु. २३४.७३ कोटी (मागील वर्षीचे मंजूर मर्यादेवर) कर्जवाटप करायचे आहे. दिनांक ३० जून २००१ अखेर २५९५३ सभासदांना रुपये ३१९८.०६ लाख नगदीने व रुपये ५९६.०१ लाख वस्तुरुपांत असे एकूण रुपये ३७७४.०७ लाख कर्जवाटप झाले आहे. गत हंगामाच्या तुलनेत सन २००१-२००२ मधील अपेक्षित पिक कर्जदरांतील वाढ वि बियाणे, खते व औषधीच्या किंमतीतील वाढ विचारांत घेता कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन बँकेचे सन २००१-२००२ ह्या वर्षात आतापर्यंत झालेल्या खरीप पीक कर्जवाटपाचा आढावा घेण्यांत आढावा घेण्यांत आला व सभेत कर्जवाटपाबाबत देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ११ :- कॉर्पस फंडाचे विनियोगासंबंधी नियमावलीस मान्यता देणे.

ठराव क्रमांक ११:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या उपविधी क्रमांक ५७(३) मधील तरतुदीनुसार आर्थिक वर्षाचे शेवटी येणाऱ्या नक्त नफ्यातून कार्पस फंड निर्माण करण्यांत येईल. शेती कर्ज वसुलीकरिता शेतकऱ्यांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी म्हणून व्याजदरांत सवलत देण्यासाठी सदरचा कॉर्पस फंड निर्माण करावयाचा आहे कोणत्याही परिस्थितीत निर्धारित उद्देशाव्यतिरिक्त इतर कोणत्याही उद्देशा-करिता सदर निधीतून मदत दिली जाणार नाही.

<u>या फंडाचे नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.</u>

अ) चालु वर्षातील पीक कर्जाची ३१ मार्च पर्यंत नियमित परतफेड करणाऱ्या

शेतक-यांना महत्तम अल्पमुदत पीक कर्जाच्या ४% पर्यंत प्रोत्साहन पर व्याज सवलत देण्यांत येईल.

ब) नियमित परतफेडीची परिभाषा करतांना अवर्षण, नैसर्गिक आपत्ती किंवा शेतीसंबंधात असे कोणतेही प्रकरण की ज्यांत प्रशासकीय आदेश देखील अंतर्भूत आहेत अशा बाबींचा विचार केला जाणार नाही.

क) कोणसाही परिस्थितीत सदर प्रोत्साहन वैयक्तिक कर्जदाराकडे असणाऱ्या चालू हंगामातील कर्ज रकमेच्या ४% पेक्षा अधिक असणार नाही.

३) सदर प्रोत्साहनाच्या टक्केवारीचे प्रमाण दरवर्षी बँकेचे संचालक मंडळ ठरवेल व त्यास आमसभेची मान्यता आवश्यक राहील.

Rules Governing Terms and Conditions for Utilisation of Corpus Fund created under 57(e) of Bye Laws:-

1) The farmers who regularly repaid the current crop loan during the season upto 31st March will be eligible to receive incentive of not more than 4% of the maximum loan outstanding against individual farmer during the season.

2) Failure of monsoon/natural calamity or any other matter inclusive of administrative orders related to agriculture shall not be considered for defining the term of regular repayment.

3) The incentive shall not in any case be more than 4% of the maximum crop loan outstanding against individual borrower farmer during the season.

4) The percentage of incentive shall be decided every year by the Board of the bank subject to approval of General body.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कॉर्पस फंडाचे विनियोगासंबंधी नियमावलीस मान्यता देण्यात आली. सदर फंडाचे विनियोगासंबंधी नियमावलीस वार्षिक साधारण सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवण्यांत यावी असे ठरले. कायदेशीर अर्थविधानाकरिता इंग्रजीतील नियमावली ग्राह्य मानल्या जाईल असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १२:- दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रूपांतर कर्ज मर्यादा रूपये १२००.०० लाख मंजूर करण्याकरिता दिनांक ११.८.२००१ रोजी करण्यांत आलेल्या सक्युलर ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक १२:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सोबत माहिती देतांना सांगितले की, सन २०००-२००१ या वर्षातील चालू लघु कर्जाचे ३० जून २००१ ला रूपांतर करण्यांत आले. या रूपांतर केलेल्या रकमेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई कडून कर्ज घेण्याकरिता कर्ज मर्यादा मंजूर करून घ्यावयाची आहे त्याकरिता मा. संचालक मंडळाचा ठराव आवश्यक आहे. नजिकचे काळांत मा. संचालक मंडळाची सभा नसल्याने व रूपांतर कर्ज मर्यादा मंजूर करून घेणेकरिता ठराव पाठविणे आवश्यक असल्याने दिनांक ११.८.२००१ रोजी खालीलप्रमाणे सक्युलर ठराव करण्यांत आला आहे.

-CIRCULAR RESOLUTION-

Resolved to borrow during the year 2001-2002 from the Maharashtra State Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd,) Mumbai, Rs. 1200.00 Lakhs only (Rs. One thousand two hundred lakhs) only of which Rs. 1200.00 lakhs for a period of 3 years and Rs. Nil for a period of 5 years for converting into Medium Term loans the Short term Agricultural loans due to the Maharashtra State Cooperative Bank Ltd, and to request that bank to apply to the National Bank for Agriculture and Rural Development (NABARD) for alike sum of lower sum on our behalf under section 22 of the National Bank for Agriculture and Rural Development Act. 1981.

वरील प्रमाणे करण्यांत आलेला सक्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १३:- सन २००१-२००२ वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्पमुदती शेती पिक कर्ज मर्यादा रूपये ५५.०० कोटी मंजूर करण्यांत आलेल्या मंजूरी पत्राप्रमाणे नियम व अटी स्विकृत करण्यास

व उवरित २.०० रुपये उचल करण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ९३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँके कडून अल्प मुदती शेती पीक कर्ज मर्यादा रुपये २२.०० कोटी पत्र क्रमांक सी(एफ) ए/ओपीआर/एफ-२३/४८५/नागपूर/दिनांक ३०.६.२००१ नुसार मंजूर झाली असुन, याबाबत राज्य बँकेने कळविलेल्या नियम व अटींना मान्यता देऊन या कर्ज मर्यादेवर उवरित २.०० कोटीची उचल करण्यासाठी सोबत जोडलेल्या ठरावास मान्यता देण्याकरिता सभेत ठेवण्यांत येत आहे.

RESOLUTION

Resolved that the terms and conditions laid down by the Maharashtra State Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/485/NAGPUR/2001-2002 Dated 30 June 2001 for the credit limit of Rs. 2200.00 lakhs (Rs. Two thousand two hundred lakhs only) sanctioned to this bank for financing seasonal Agricultural operations under pooled rate scheme for the year 2001-2002 be and are hereby accepted and resolves to take remaining drawals of Rs. 200.00 lakhs (Rs. Two hundred lakhs) only.

Further, resolved that anyone of the following bearers from Group "A" alongwith anyone from officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 2200.00 lakhs only sanctioned for Short term seasonal Agricultural credit limit for the year 2001-2002.

Further, resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone from the Officer from Group 'B" are hereby authorised to sign jointly the under taking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd, Nagpur creating first charge on the promotes of the Agricultural credit societies and Act as

custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra state Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this bank in favour of the Maharashtra state Cooperative Bank Ltd.) Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this bank.

1.) Chairman } - Group- 'A'
2.) Vice chairman }
3.) General Manager — Group 'B'.

वरिल प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १४:- रिझर्व बँकेचे मार्गदर्शक सुचनेनुसार एसजीएल (SGL) अकाउंट महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत सुरु ठेवण्याकरिता नविन करार करुन पाठविण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १४:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नविन मार्गदर्शक सुचनेनुसार गव्हर्नमेंट सेक्युरिटीज (GOI securities) खरेदी विक्रीचे व्यवहारासाठी सीएसजीएल (CSGL) खाते राज्य बँकेमार्फत सुरु ठेवणेकरिता पत्र क्रमांक ए१/एफएफ/१२/२००१-२००२ दिनांक २१.८.२००१ सोबत पाठविलेल्या नमुन्यांत नविन करार करुन नविन कराराच्या दोन प्रति राज्य बँकेचे फंडस मॅनेजमेंट विभागाकडे पाठविणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे ठराव करुन पाठवायच्या आहे.

- RESOLUTION -

Resolved that the Maharashtra State Coop. Bank Ltd, (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai be and are hereby requested to open SGL Account of our bank in the name of THE NAGPUR DISTRICT CENTRAL COOPERATIVE BANK LTD, NAGPUR.

It is further resolved that any two of the following officers jointly are authorised to operate the SGL account

and authorise to place order for sale/purchase of investment from time to time.

| Sr No. | Name of person | Designation |
|---|---|---|
| 1) | Shri Sunil Kedar | Chairman |
| 2) | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 3) | Shri S.S. Gode | Manager (officg) |
| 4.) | Shri S.S. Aglawe | Deputy chief officer. |

Seen

विषयावर सविस्तर चर्चा होउन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने पाठविलेल्या नमुन्यांत नविन करार करून कराराच्या दोन प्रति महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे सदरच्या ठरावासह पाठविण्यांत याव्यांत असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १५ :- आपले बँकेतील कर्मचाऱ्यांना बोनस/सानुग्रह अनुदान देणेकरिता महाराष्ट्र राज्य को-ऑप. बँक कर्मचारी संगठनेने केलेल्या मागणीअर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १५ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र स्टेट कोऑप. बँक कर्मचारी संगठणेने आपले बँकेतील कर्मचाऱ्यांना यावर्षी सन २०००-२००१ वर्षाकरिता बोनस/सानुग्रह अनुदान देणेकरिता दिनांक ७.६.२००१ रोजीचे पत्रानुसार मागणी केलेली आहे. मागील वर्षी १९९९-२००० आपले बँकेतील कर्मचाऱ्यांना १२% प्रमाणे बोनस/सानुग्रह अनुदान देण्यांत आले होते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन आपले बँकेतील कर्मचारी/अधिकारी यांना ह्या वर्षी बोनस/सानुग्रह अनुदान देणेबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष महोदय यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६ : मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १६(१) - ~~मा० अ०~~ बँकेचे मुख्य हिशेबनिस श्री एस.डी. पेशकर यांचे सेवेचा कार्यकाल दिनांक १३.६.२००१ रोजी संपत असल्याबाबत.

ठराव क्रमांक १६(१) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की,

बँकेचे मुख्य हिशेबनिस श्री. ए.डी.गोरवले दिनांक ८.६.२००० ला बँकेचे सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री. एस.डी.पेशकर, रिझर्व बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त अधिकारी यांना बँकेत मुख्य हिशेबनिस म्हणून एक वर्षाकरिता घेण्यांत आले. त्यांचे सेवेचा १ वर्षाचा कालावधी दिनांक १३।८।२००१ रोजी संपत आहे. मुख्य हिशोबनिस ही जागा रिक्त असून ह्या जागेवर करार पद्धतीवर एक वर्षाकरिता नियुक्त केलेले श्री. एस.डी.पेशकर यांचे कामकाज व बँकेची निकड विचारांत घेता त्यांचे सेवेचा कालावधी वाढविण्यांत यावा. असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री. एस.डी.पेशकर यांचे मुख्य हिशोबनीस म्हणून सेवेचा कालावधी एक वर्षाकरिता दिनांक १३।८।२००२ पर्यंत वाढविण्यांत यावा असे ठरले. त्यांचे पगारवाढीबाबत व सोयी सवलतीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहेत असेही ठरले.

सुचक : श्री. मु.श्री.पळसे

अनुमोदक : श्री मो.वि.निमजे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १९(२) : बँकेच्या अधिकारी व कर्मचारींकरिता ग्रुप सेव्हींग्ज लिंक इंशुरन्स स्किम अंतर्गत विमा पॉलीसी उतरविणे बाबत...

ठराव क्रमांक १९(२) : मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनां ३०।७।२००१ रोजीचे मा. व्यवस्थापक समितीचे सभेत कर्मचारी/अधिकारी यांची अपघात विमा पॉलीसी बँकेत राबविण्यात यावी असा निर्णय घेतला आला आहे. कर्मचाऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याचे दृष्टीने विमा पॉलीसी उतरविणे बाबत मा. सरव्यवस्थापक यांनी आवश्यकता दर्शवून कर्मचाऱ्यांचे हिताचे व सोयीचे दृष्टीने ग्रुप सेव्हींग्ज लिंक इंशुरन्स स्किम अंतर्गत काढावयाच्या पॉलीसीच्या प्रस्तावांत खालील बाबी निर्देशित असल्याचे सांगितले.

१. या प्रस्तावांत कर्मचारी व बँकेचे समान रकमेचे अंशदान राहणार आहे.

२. कर्मचाऱ्यांचा अपघात झाला नसला तरी निवृत्तीनंतर अथवा नैसर्गिक मृत्युनंतर व्याजासह संपूर्ण विमा रक्कम परत मिळणार आहे.

३. योजनेत प्रथम दोन महिन्याचे प्रिमियम समान रकमेत ५०% – ५०% एकमुस्त भरावयाचे आहेत.

४. कर्मचाऱ्यांच्या ग्रेडनुसार विमा पॉलीसी उतरावयाची असल्याने ग्रेडवाईज विमा हप्त्यांची रक्कम दरमहा बँकेमार्फत भरावी लागेल.

५. विमा हप्त्याची रक्कम भरण्याकरिता कर्मचाऱ्यांच्या ग्रेडनुसार खालीलप्रमाणे

ठरवावा लागेल.

१) उपमुख्याधिकारी ते व्यवस्थापक रुपये १.७५ लाख
२) अवर्ग अधिकारी ते ब वर्ग अधिकारी रुपये १.५० लाख
३) लिपीक ते टायपिस्ट रुपये १.२५ लाख
४) ड्रायव्हर व शिपाई रुपये ०.८० लाख

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्मचाऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळण्याचे दृष्टीने ग्रुप सेव्हींगज् लिंकड इंन्सुरन्स स्किम अंतर्गत विमा पॉलिसी उतरविण्याकरिता तत्वत: मान्यता देण्यांत आली. सदर योजना केवळ जीवन विमा निगमद्वारे राबविली जात असल्यामुळे जीवन विमा निगम कडून सुधारीत अद्यावत माहिती घेऊन त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यांत यावा. या प्रस्तावावर निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

सुचक : श्री भा. चं. शहाणे
अनुमोदक : श्री व. क. पाराशिवनिकर

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६ (3) : स्पेशल कॉन्टीनजन्सी फंड फॉर वेलफेअर ऑफ एम्प्लाईज निर्माण करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १६ (3) : मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, जवळी शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. आर. के. रोकडे, लिपीक श्री बी. एम. झोडे व शिपाई श्री पी. बी. शहाणे यांचे दिनांक २१.७.२००१ रोजी अपघातात आकस्मिक निधन झाले. सदर मृतकाचे वारसदांना बँकेकडून आर्थिक सहाय्य करणेकरिता दिनांक ३०.७.२००१ रोजीचे मा. व्यवस्थापक समितीचे सभेत कॉन्टीनजन्सी फंड फॉर वेलफेअर ऑफ एम्प्लाईज निर्माण करून अपघातात मृत झालेल्या तिन्ही कर्मचाऱ्यांचे वारसदारांना आर्थिक सहाय्य करण्यांत यावे असा निर्णय घेण्यांत आला आहे. मान्यते करिता सदर विषय सभेपुढे आणला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन जवळी शाखेचे कर्मचारी श्री रोकडे, श्री झोडे व श्री शहाणे ह्या मृतकाच्या वारसदारांना आर्थिक मदत करण्याकरिता स्पेशल कॉन्टीनजन्सी फंड फॉर वेलफेअर ऑफ एम्प्लाईज स्वतंत्रपणे निर्माण न करता २००१-२००२ ह्या वर्षाचे चालु खर्चातून रुपये १०.०० लाख (रुपये दहा लाख फक्त)

नांवे एकून कर्मचारी कल्याण निधीत वळते करण्यांत यावे व ह्या निधीमधून सदर कर्मचाऱ्यांना ह्या निधीचे काम पाहणाऱ्या समितीने निर्णय घेउन आर्थिक मदत करावी असे ठरले.

सुचक : श्री. अ. रा. गुप्ता

अनुमोदक : श्री. व. भा. वांढे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १९(४) : सन २००१-२००२ या कालावधीत इमारत बांधकाम, प्लॉटखरेदी व गाळा खरेदीबाबत..

ठराव क्रमांक १९(४) : मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक ३१ मार्च २००१च्या बँकेच्या ताळेबंदानुसार बँकेकडे एकूण इमारत निधी रु.४६२०१००१/- असून इमारत बांधकामापोटी खर्च रुपये २२३७८२३०८.६१ एवढा आहे. सन २००१-२००२ ह्या आर्थिक वर्षात प्लॉट खरेदी करून बांधकाम करणे, उपलब्ध असलेले प्लॉटवर बांधकाम करणे व शहर विभागातील मंजूर प्राप्त नियोजित शाखाकरिता गाळा खरेदी करण्याचे प्रस्ताव विचाराधीन आहे. याकरिता येणारा खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | शाखेचे नांव | विवरण | तालुका | अपेक्षित खर्चाचा अंदाज रु.लाखात |
|---|---|---|---|---|
| १. | धापेवाडा | प्लॉट खरेदीकरून बांधकाम करणे | कळमेश्वर | १०.०० |
| २. | खापा | इमारत बांधकाम | सावनेर | १०.०० |
| ३. | खापरखेडा | प्लॉट खरेदी करून बांधकाम करणे | सावनेर | १५.०० |
| ४. | कोराडी | प्लॉट खरेदी करून बांधकाम करणे. | कामठी | १५.०० |
| ५. | मेटपांजरा | इमारत बांधकाम | काटोल | ८.०० |
| ६ | पारडसिंगा | प्लॉट खरेदी करून बांधकाम करणे | काटोल | ८.०० |
| ७. | जलालखेडा | इमारत बांधकाम | नरखेड | ८.०० |
| ८. | भिवापूर | इमारत बांधकाम | भिवापूर | ४१.०० |
| ९. | बेला | इमारत बांधकाम | उमरेड | १४.०० |
| १०. | सिर्सी | प्लॉट खरेदीकरून बांधकाम करणे. | उमरेड | ८.०० |
| ११. | देवलापार | प्लॉट खरेदीकरून बांधकाम करणे. | रामटेक | ८.०० |
| १२. | कवडस | प्लॉट खरेदीकरून बांधकाम करणे. | हिंगणा | ८.०० |
| १३. | जिल्हा परिषद | प्लॉट खरेदी करून बांधकाम करणे | नागपूर | २५.०० |
| १४. | मानेवाडा (नियो.) | गाळा खरेदी | शहर | २०.०० |
| १५. | स्वावलंबीनगर (") | गाळा खरेदी | शहर. | २०.०० |
| | | | एकूण : | २१२.०० |

वरीलप्रमाणे बँकेच्या १३ शाखांकरिता प्लॉट खरेदी/इमारत बांध-कामासाठी तसेच नियोजित दोन शाखांकरिता प्लॉट खरेदी/इमारत बांध-कामासाठी एकूण अंदाजित रुपये २.१२ कोटीचा खर्च अपेक्षित आहे.

मा. अध्यक्ष यांनी इमारत निधी व इमारत बांधकामाबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १६(५): बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०चे कलम १५६ अंतर्गत पुढील आदेशापर्यंत वसुलीचे अधिकार मिळणेबाबत मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक १६(५): विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, थकित कर्जाची वसुली करणेकरिता बँकेचे अधिकारी यांना वसुलीची कार्यवाही करण्याकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक २१मार्च २००० प्रमाणे काल मर्यादा न घालता वसुलीचे अधिकार मिळणेबाबत मा० विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्जाची वसुली करणेकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे दिनांक २१।३।२००० चे पत्राप्रमाणे देण्यात येणाऱ्या अधिकाराबाबत कालमर्यादा न घालता खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०चे कलम १५६(१)(अ)(ब)(क) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६०चे कलम २(एम) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३),(५),(६)(७)(९)(१०)(११)(अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून)(१२),(१३)(१४)(१६)(१९) व (२०) तसेच कलम १०१ व (१३७) नुसार अधिकार प्रदान होणेस्तव मा. विभागीय सह-निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावी लागेल.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्री जी. एस. दडमल | निरिक्षक | खात | नागपूर जिल्हा. |
| २. | श्री बी. एस. सातफळे | निरिक्षक | कान्होलीबारा | —״— |
| ३. | श्री बी. बी. पन्हेरिया | निरिक्षक | कन्हान | —״— |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १६(६) : बँकेकडे येणाऱ्या कर्ज प्रकरणावर देखरेख ठेवणेसाठी दक्षता उपसमिती (मॉनिटरींग सबकमेटी) नियुक्त करणे.

ठराव क्रमांक १६(६) : मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेकडे कर्ज प्रकरणे येतात. ह्या कर्जप्रकरणावर देखरेख ठेवणे आवश्यक आहे. त्याकरिता दक्षता उपसमिती (मॉनिटरींग सबकमेटी) नियुक्त करण्यांत यावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेकडे मंजुरीकरिता प्राप्त होणाऱ्या कर्जप्रकरणावर देखरेख ठेवण्याकरिता दक्षता उपसमिती (मॉनिटरींग सबकमिटी) नियुक्त करण्यांत यावी असे ठरले. ही दक्षता उपसमिती, उपसमितीचे अध्यक्ष, पांच सदस्य व बँकेचे २ अधिकारी अशी एकूण ८ व्यक्तींची राहणार असून खालील प्रमाणे अध्यक्ष, सदस्य व सचिव राहणार आहेत.

१. ह्या उपसमितीचे अध्यक्ष म्हणून बँकेच्या मा. उपाध्यक्षा हे काम पाहतील.
२. याशिवाय बँकेचे संचालक मंडळातील ५ संचालक या उपसमितीचे सदस्य असतील.
३. याशिवाय ह्या उपसमितीमध्ये बँकेचे व्यवस्थापक व मुख्याधिकारी (कर्ज विभाग) राहतील.
४. ह्या उपसमितीचे सचिव म्हणून मुख्याधिकारी (कर्ज विभाग) काम पाहतील.

ह्या उपसमितीचे पांच सदस्य कोणते संचालक राहतील याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १६(७) : सन २०००-२००१ मधील नफ्याच्या विनियोग संदर्भात विचार करणे.

ठराव क्रमांक १६(७) : मा. सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मागील दिनांक ६.६.२००१ चे सभेत २०००-२००१ ह्या सालांतील नफ्याचा विनियोग करणे संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष महोदय यांना देण्यांत आले होते. विनियोगाकरिता रुपये ८५९०२६६९.०६ उपलब्ध नफ्यातून त्यांनी खालीलप्रमाणे रुपये ६७५२२८७१.२२ एवढ्या रकमेचा विनियोग करणे संदर्भात सुचविले आहे.

| | |
|---|---|
| १. रिझर्व फंड (उपविधी ५७ प्रमाणे) | रु. २१४७५४४१.३९ |
| २. ऋण स्थायीकरण फंड (उपविधी ५७ प्रमाणे) | रु. १२६८५२६६.६३ |
| ३. लाभांश २०% प्रमाणे (दि. ३१.३.२००० चे भागभांडवलावर) | रु. १९७७६५००.०० |
| ४. धर्मदाय निधी | रु. ५०००००.०० |
| ५. कॉर्पस फंड (५७ (ई)(i) अन्वये) | रु. १२६८५२६५.०० |
| | रुपये ६७५२२८७१.२२ |

वरीलप्रमाणे विनियोग सुचविल्यानंतर रुपये १८३७९५९७.८४ रक्कम शिल्लक आहे. यावर मा. अध्यक्ष म्हणाले की, सदर शिल्लक रकमेतून इमारत फंड व कर्मचाऱ्यांकरिता बोनस/सानुग्रह अनुदान या दोन बाबींवर विनियोग करणेबाबत सभेने निर्णय घ्यायचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचविलेल्या विनियोगास मान्यता देऊन उर्वरित रकमेचा विनियोग इमारत निधीकरिता रुपये १०३३९०००.००, कर्मचाऱ्यांना बोनस/सानुग्रह अनुदान रुपये ८०४००००/- विनियोग करून शिल्लक रक्कम रू. ५९७.८४ पुढील वर्षाकरिता अग्रेषित करण्यांत यावा असे ठरले. सन २०००-२००१ या सालातील विनियोगपात्र नफ्याच्या रकमेचा खालीलप्रमाणे विनियोग करणेसाठी मान्यतेस्तव वार्षिक साधारण सभेला शिफारस करण्यांत आली.

| | | |
|---|---|---|
| मागील शिल्लक नफा | रुपये | ७०३.५३ |
| अधिक ९९-२००० ह्या वर्षाचा नफा | रुपये | ९,५९,०१,७६५.५६ |
| ३१ मार्च २००१ रोजीचे ताळेबंदानुसार विनियोगासाठी शिल्लक नफा | रुपये | ९५९०२४६९.०९ |

ह्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यास शिफारस आहे.

| | | |
|---|---|---|
| १. रिझर्व फंड : (सहकारी कायद्याचे कलम ६६ पोटनियम क्र. ५७ प्रमाणे सन २०००-२००१ मधील निव्वळ नफ्याच्या २५%) | रुपये | २१४७५४४१.३९ |
| २. ग्रहण स्थायीकरण फंड : (पोटनियम क्र. ५७ प्रमाणे २०००-२००१ मधील निव्वळ नफ्याचे १५%) | रुपये | १२८८५२६४.८३ |
| ३. लाभांश (२०% प्रमाणे दि. ३१.३.२००० चे भागभांडवलावर) | रुपये | १९७७६९००.०० |
| ४. कर्मचाऱ्याकरिता बोनस/सानुग्रह अनुदान: | रुपये | ८०४००००.०० |
| ५. धर्मादाय निधी : | रुपये | ५०००००.०० |
| ६. इमारत निधी : | रुपये | १०३३९०००.०० |
| ७. कॉपरस फंड १५% प्रमाणे (पोटनियम ५७(ड) अन्वये) | रुपये | १२८८५२६५.०० |
| ८. शिल्लक नफा : (पुढील वर्षाकरिता अग्रेषित) | रुपये | ५९७.८४ |
| एकूण | रुपये | ९५९०२४६९.०९ |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १६(८): बँकेची कॅश व्हॅन क्रमांक एम एच ३१ एम ३२५० विकण्याची व एक नविन कॅश व्हॅन खरेदी करणेकरिता सहकार खात्याकडून परवानगी मिळाल्यानुसार कार्यवाही करणे बाबत.

ठराव क्रमांक १६(८) : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २६।२।२००७ रोजीचे मा. व्यवस्थापक समिती सभेत बँकेची कॅश व्हॅन क्रमांक एम एच ३१/एम-३२५० विकण्याकरिता व एक नविन गाडी खरेदी करणेकरिता निर्णय घेवुन सहकार खात्याची परवानगी मिळणेसाठी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे प्रस्ताव पाठवून विनंती करण्यांत आली होती. त्या अनुषंगाने मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांनी दिनांक २१ एप्रील २००७ चे पत्रान्वये बँकेची कॅश व्हॅन क्रमांक एम.एच ३१/एम-३२५० जाहिर लिलावाने विकण्याची व एक नविन कॅश व्हॅन खरेदी करण्याची परवानगी कळविली आहे.

मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून बँकेची कॅश व्हॅन विकणेकरिता व नविन कॅश व्हॅन खरेदी करण्याकरिता मिळालेल्या परवानगीबाबत - दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली व विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेची कॅश व्हॅन क्रमांक एम.एच.३१/एम-३२५० विकण्यास व एक नविन कॅश व्हॅन खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर विणकर संस्थांच्या विपणन विकास सहाय्य (एम.डी.ए) बाबत चर्चा करतांना मा. जिल्हा उपनिबंधक यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून विपणन विकास सहाय्य (एम.डी.ए) प्रस्ताव पाठविण्याबाबतची प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार आहेत.

---

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने मा. अध्यक्ष यांनी सभेला उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले,

[signature] [signature]

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शनिवार दिनांक २१.९.२००९ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील स्व. माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. ह्या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. मा. श्री. श्रा. चं. शहाणे | " |
| ५. मा. श्री. अ. श. गुप्ता | " |
| ६. मा. श्री. व. श्रा. वांढे | " |
| ७. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ८. मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| ९. मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| १०. मा. श्री. सं. लि. चोरे. | " |
| ११. मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १२. मा. श्री. वि. श. हुलके | " |
| १३. मा. श्री. ना. र. जोगेकाटे | " |
| १४. मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १५. मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १६. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १७. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. मा. श्री. ब. श्रा. तायवाडे | " |
| १९. मा. श्री. मु. भि. पल्लासे | " |
| २०. मा. श्री. अ. शं. धार्मीक | " |
| २१. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर | " |
| २२. मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २३. मा. श्री. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २४. मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |

२५. मा. श्री बी. व्ही. असवार, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक) नागपूर.

२६. मा. श्री. व्ही. जी. शहाणे कर्मचारी प्रतिनिधी

२७. मा. श्री. ए. एन. चौधरी, सरव्यवस्थापक

- अनुपस्थित -

१, मा.श्री. र.गो. बंग संचालक

२, मा.श्री. वि.ज्ञा. राहुत ''

3. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर

४. मा.श्री. अ.ना. पोरेड्डीवार, प्रतिनिधी म.रा.स.बँक म. मुंबई.

५, मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

६ मा.श्री. एल.जी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी.

७, मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८ मा. विभागीय अधिकारी, म.रा.स.बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.

सभेला अनुपस्थित असलेले मा.श्री. र.गो. बंग व मा.श्री. वि.ज्ञा. राहुत संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १:- मागील दिनांक ३१ जुलै २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयानुषंगाने चर्चा होवुन मागील दिनांक ३१ जुलै २००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २:- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ३१ जुलै २००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. सरव्यवस्थापक यांनी थोडक्यात माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक 3:— चालु वर्षात झालेल्या बँकेचे खरीप पीक कर्ज वाटपाचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक 3:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा नाबार्ड व जिल्हा अग्रणी बँक यांचे सहकार्याने तयार करण्यांत आलेल्या रुपये १६.१२ कोटीचे क्रेडीट

प्लॅन पैकी खरीप व रब्बी करिता रूपये ५३.२८ कोटीचा तयार केला आहे. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पूणे यांचे सुचने नुसार तीन वर्षातून एकदा तयार करावयाची क.म.पत्रके ९९-२००० मध्ये १९९९-२००० ते २००१-२००२ पर्यंतचे तीन वर्षासाठी क.म.पत्रके तयार करण्यांत आली असून त्यानुसार रूपये २३४७३.७५ लाख मर्यादा मंजूर आहेत. त्याच मंजुरीच्या आधारावर चालुवर्षी कर्जवाटप करण्यांत येत आहे.

सन २००१-२००२ ह्या वर्षाकरिता खरीप कर्जवाटपास दिनांक १एप्रिल २००१ पासून सुरूवात झाली असून दिनांक ३१ ऑगस्ट २००१ अखेर धान, ज्वारी, तूर, मुंग, सोयाबीन, कापूस, मिरची, संत्रा व इतर पिकांकरिता ५९८ संस्थांचे ३०७७८ सभासदांना ६४९७८ हेक्टर जमिनीकरिता रु.३६७९.६३ लाख नगदी व रु.१२७७.२२ लाख वस्तुरूप असे एकूण रूपये ४९५३.८५ लाखाचे कर्जवाटप करण्यांत आले आहे. बी-बियाणे, खते, औषधीच्या किंमतीत वाढ झाल्याने या कालावधीकरिता मागील वर्षी करण्यांत आलेल्या कर्जवाटपापेक्षा यावर्षी कर्जवाटप रूपये ४४६.१७ लाख जास्त झाले आहे. पिक कर्ज दरातील वाढ विचारांत घेता क्रेडीट प्लॅनप्रमाणे रूपये ५३.२८ कोटी कर्जवाटपाचे उद्दिष्ठ पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन चालु वर्षात झालेल्या खरीप पिक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यात आला व ह्या संदर्भात देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक ४ :- माहे ऑगस्ट २००१ अखेर कर्जवसुली आढावा घेणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बॅंकेने तयार केलेल्या कृती कार्यक्रमाप्रमाणे कर्ज वसुलीची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. तालुका स्तरावर विशेष वसुली अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त सभासदांशी संपर्क साधता यावा या दृष्टीने माहे नोव्हे. २००० ते जून २००१ पर्यंत तालुका निहाय टेक जीप गाडी देण्यात आली. सन २००० - २००१ ह्या पिक हंगामात जिल्ह्यातील पिकांची परिस्थिती फारसी समाधानकारक नसतानाही कर्जवसुली करिता जास्तीत जास्त पाठपुरावा करून तसेच थकबाकीदारांकडे जप्तीची मोहीम तिव्रगतीने कार्यान्वित करून वसुली रॅली सभा तालुका स्तरावर आयोजीत करून कर्जवसुली करिता पोषक वातावरण तयार करण्यांत आले व कर्जवसुली करण्यांत आली. शासनाने ५० पैसे खाली पैसेवारी

जाहिर केलेल्या गावातील चालु कर्जाचे रूपांतर करणेबाबत दिलेल्या शासनाचे सुचने प्रमाणे चालु कर्जाचे रूपांतर करण्यांत आले. ह्या वर्षी दिनांक ३१ ऑगस्ट २००१ अखेर रूपये ४११३.९६ लाख रोख व रूपये १०७१.८४ लाख रूपांतर असे एकुण रू. ५१८५.८० लाख मुद्दलांत वसुली झाली असून रूपये १२५२.३१ लाख व्याजांत वसुली झाली आहे मागील वर्षी ऑगस्ट २००० अखेर वसुलीचे शेकडा प्रमाण ३५.७२% होते. मागील वर्षाचे तुलनेत या वर्षी शेतकी कर्ज वसुलीत ५.६७% वाढ झाली आहे. ह्या वर्षी रूपये ६४८८.९२ लाख थकित व रूपये ६०३१.१२ लाख चालू एकुण रूपये १२५२०.०४ लाख कर्ज मागणी पोटी रूपये ३३१९.०० लाख थकित कर्ज व रूपये १८६६.८० लाख चालु कर्ज एकूण रूपये ५१८५.८० लाख कर्जवसुली माहे ऑगस्ट २००१ अखेर झाली आहे. व रूपये १२५२.३१ लाख व्याजांत वसुली झाली आहे. कर्जवसुली ४१.३९% असली तरी एवढ्यावर समाधान करून न घेता वसुलीसाठी अधिक प्रयत्न करावे लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होउन दरवर्षी थकित कर्जात होणारी वाढ योग्य नाही. त्यामुळे थकित कर्ज वाढणार नाही या दृष्टीने प्रयत्न आवश्यक असून एकुण कर्जवसुलीचे प्रमाण वाढविण्यावर भर देण्यांत यावा व याकरिता कर्ज वसुली मोहिम अधिक तिव्रतेने राबविणेत यावी. कर्जवसुली बाबत देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ :- बँकेच्या तरला जींदगीसाठी राखावयाच्या निधीचे विनियोगाबाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट मधील कलम १८ अन्वये एकुण डिमांड व टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी ३% रोख निधी व कलम २४ अन्वये कमीत कमी २५% तरती जींदगी राखावयाची असते. यानुसार माहे ऑगस्ट २००१ अखेर बँकेनी रूपये ५४८.७४ कोटीचे एकुण डिमांड व टाईम लायबीलिटीजच्या नियमाप्रमाणे ३% रोख निधी रूपये १६.४६ कोटी राखावयाचा होता. बँकेने रूपये २८.६३ कोटी रोख निधी राखलेला आहे त्याचप्रमाणे २५% तरती जींदगी रूपये १३७.१८ कोटी राखावयाची होती. बँकेने रूपये ३१९.४७ कोटी सरकारी मान्यता प्राप्त बाँड, एस.जी.एल; फिजिकल फाममधील शासकीय प्रतिभूती, महा. राज्य सहकारी बँकेत मुदती ठेवी व निधी ह्यामध्ये गुंतवून तरती जींदगी राखली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकींग रेग्युलेशन ॲक्ट मधील कलम १८ अन्वये एकुण डिमांड व टाईम लायबीलिटीजच्या कमीत कमी ३%

रोख ठेवणेकरिता प्रत्यक्षांत राखलेल्या रोख निधीस व कलम 24 अन्वये कमीत कमी २५% तरती जींदगी राखणेकरिता माहे आगस्ट २००७ अखेर बँकेनी महाराष्ट्र राज्य सह. बँकेतील मुदती ठेवी, एसजीएल व फिजीकल फार्ममध्ये खरेदी केलेल्या सरकारी प्रतिभूती, नाबार्ड बॉण्डस् इत्यादि मध्ये केलेल्या गुंतवणु-कीस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- कोल्ड स्टोअरचे मुदती कर्जावरील व्याज दर १५% वरून १४% करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कृषिवर आधारीत कॅपिटल इनव्हेस्टमेंट सबसिडी स्किम अंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी बँकानी कर्जपुरवठा केल्यास त्यावर बँकांना फेरकर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याचे व उद्योजकाला प्रकल्प खर्चाचे 50% किंवा जास्तीत जास्त रूपये 50.00 लाख रकमेपर्यंत अनुदान देण्याची नाबार्डची योजना आहे.

सदर योजनेअंतर्गत कृषि उत्पन्न बाजार समिती नागपूर येथे कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. नागपूर ह्या संस्थेला रूपये १७०.०० लाख व मे. विदर्भ कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. नागपूर ह्या संस्थेला रूपये १३८.०० लाख मुदती कर्ज १५% व्याजदराने मंजूर करून कर्जपुरवठा केला आहे. त्यांनी ह्या कर्जाची उचल घेवुन कोल्ड स्टोअरेज उभारणी केली आहे.

नाबार्डचे कॅपीटल इन्व्हेस्टमेंट सबसिडी स्किम अंतर्गत बँकेनी फेर कर्जाकरिता मागणी केली असून, संस्थेने देखील सबसिडीकरिता प्रकरण सादर केले आहे. सबसिडी करिता नाबार्डने कर्जावरील व्याजदर १४ पी.एल.आर +१% याप्रमाणे सध्या (१४%) ठरविला आहे. परंतु बँकेने कोल्ड स्टोअरजचे कर्जावर १५% व्याजदर आकारला आहे त्यामुळे सदर प्रकरणांत नाबार्डने अनुदान मंजूर केले नाही व सदर योजनेमध्ये अंतिम लाभार्थ्यांस व्याजदर १५% वरून १४% करण्यात यावा व तशी दुरूस्ती घेतल्याबाबत नाबार्डला कळविण्यास सुचविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन कृषिवर आधारीत कॅपीटल इन्व्हेस्टमेंट सबसिडी स्किम अंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी कर्जपुरवठ्यावर सबसिडी मिळणेसाठी नाबार्डचे अटीप्रमाणे कर्जावरील व्याजदर

पी.एल.आर +१% (१४%) करण्यांत यावा व तसे नाबार्डला कळविण्यांत यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७:- सन २००१-२००२ च्या कर्जवसुलीचा "कृती कार्यक्रम" मंजूर करणे

ठराव क्रमांक ७:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २००१-२००२ च्या वर्षात केलेल्या कर्जवाटप रकमेची तसेच थकित असलेल्या कर्जरकमेची वसुली प्रभावीपणे करण्याचे दृष्टीने सन २००१-२००२ करिता कर्ज वसुलीचा कृती कार्यक्रम (ॲक्शन प्लॅन) तयार करण्यांत आला आहे. तयार करण्यांत आलेला कर्जवसुली करिताचा कृती कार्यक्रम सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन तयार करण्यांत आलेला सन २००१-२००२ करिता कर्जवसुलीचे कृती कार्यक्रमास (ॲक्शन प्लॅन) सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८:- ठेवीवरील व्याजदरांत बदल करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा. संचालक मंडळाचे मान्यतेने ठेवीवरील व्याजदरांत सुधारणा करून सुधारीत व्याज दर दिनांक १.४.१९९९ पासून अमलांत आणले होते. बँकेच्या दिनांक ३१ ऑगस्ट २००१ चे ताळेबंदानुसार मुदती ठेवीचे प्रमाण एकूण ठेवीच्या ७०.३९% असून दिवसें दिवस मुदती ठेवीत वाढ होत आहे. दिनांक ३१ मार्च २००१ ला संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेचा सरासरी कॉस्ट ऑफ डिपॉझीट दर ८.५८ असून कर्जावरील उत्पन्नाच्या सरासरी दर १२.५६% आहे. ठेवीवरील व्याजदरांत सुधारणा (बदल) करणेसाठी चर्चा करून निर्णय घेणेकरिता आपले बँकेचे ठेवीवरील व्याजदरासोबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, कांही नागरीक बँका, राष्ट्रीयकृत बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्याजदर तुलनात्मक सादर केले आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठेवीवरील सध्याचे व्याज दरांत कोणतीही सुधारणा (बदल) न करता खालीलप्रमाणे असलेले ठेवीवरील सध्याचेच व्याजदर कायम ठेवण्यात यावे असे ठरले.

<u>व्याज दर</u> - अ) चालु ठेव - - - - - - - - - - - ०.५०%

ब) बचती ठेव - - - - - - - - - - - ५.५०%

क) मुदती ठेव...

१) ३० दिवस ते ९० दिवस ------- ७.००%
२) ९१ दिवस ते १८० दिवस ------- ८.००%
३) १८१ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी --- ९.५०%
४) १ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी --- ११.००%
५) २ वर्ष ते ४ वर्षापेक्षा कमी --- १२.५०%
६) ४ वर्ष आणि त्यावर ----- १३.००%

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९:- एकरकमी कर्जपरत फेड योजना राबविण्याबाबतचे मसुद्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ९:- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, १९९७पासून जिल्हा सहकारी बँकांमध्ये बँकेचे वैयक्तीक कर्जदाराकडे बिगरशेती संलग्न संस्थाकडे सेवा / विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडे असलेल्या थकित कर्जापोटी एन.पी.ए. (नॉन परफार्मींग असेट)ची तरतुद करण्यांत येत आहे. दरवर्षी करावयाच्या एनपी.ए.च्या तरतुदीमध्ये वाढ होत आहे. ही बाब विचारांत घेउन बँकेच्या वैयक्तीक सभासद संलग्न बिगरशेती संस्था तसेच सेवा/विविध कार्यकारी संस्था इत्यादिकडे असलेल्या थकबाकीची रक्कम कमी करण्यासाठी नाबार्ड, राज्य शासन यांनी एकरकमी कर्जपरतफेड योजना (वन टाईम सेटलमेंट) लागू करण्यास कळविले आहे. ह्या योजनेतील मार्गदर्शक सुचना विचारात घेउन बँकेने एकरकमी कर्ज वसुली योजनेचा मसुदा तयार केला आहे. सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन कार्यालयाने सुचविलेल्या योजना प्रस्तावावर खालीलप्रमाणे बदल सुचविण्यात आले.

<u>शेती कर्जबाबत</u>:-

१) सेवा सहकारी संस्थेच्या सभासदाने कर्ज घेतल्यापासून त्यांचेकडून एक वर्षापर्यंतचे त्यावेळचे प्रचलित दराने चालु व्याज घेण्यांत यावे.
२) थकित झाल्याचे तारखेपासून तीन वर्षापर्यंत त्या त्या वेळचे प्रचलीत दराने दंड व्याजासहित एकुण व्याज विचारांत घेण्यात यावे.
३) तीन वर्षाचे व्याज विचारांत घेतल्यानंतर तडजोडीचे तारखेपर्यंत वेळोवेळी आलेल्या व्याजाच्या वसुलीचा भरणा विचारांत घेण्यात यावा व हे व्याज वरील क्रमांक १ व २ प्रमाणे होणाऱ्या बेरजेतून वजा करावे.

४) मुद्दल विचारांत घेतांना तडजोडीच्या तारखेला मुद्दलाची असलेली कर्जबाकी विचारांत घेण्यांत यावी.

५) तडजोडीच्या तारखेला ज्या सभासदांकडे एक किंवा सर्व प्रकारची कर्जे उदा. अल्पमुदती मध्यममुदती व दिर्घमुदती पूर्णपणे थकित झाले असतील अशाच सभासदांची निवड व्हावी.

६) तडजोडीच्या तारखेला लाभार्थी संस्थांकडील एकूण थकित रकमेच्या ५%रक्कम प्रथम वसुल करुन उर्वरित रक्कम एक वर्षात वसुल होईल ह्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन हप्ते पाडून देवुन त्या रकमेवर १२%व्याजदराने आकारणी करण्यांत यावी.

७) सभासदाने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर व त्यांचेकडील थकित रकमेच्या ५०% रकम वसुलीत भरणा केल्यानंतरच सभासदाला कर्जउच्चलक्षमते पर्यंत पिक कर्ज वाटप करण्यांत यावे.

वरीलप्रमाणे दुरुस्त्या विचारांत घेवुन प्रस्तावास मान्यता देण्यांत आली. तसेच प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नागपूर यांचेकडे पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७०:- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे

विषय क्रमांक ७०(१):- बँकेच्या तालुकास्तरावरील इमारतीत नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप सोसायटीचे कार्यालयास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७०(१):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, आपल्या बँकेचे तालुका स्तरावरील शाखा कार्यालयांत नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटीचे कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार त्यांचेकडून मागणी होत असते. डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटी कडून आलेल्या मागणीप्रमाणे बँकेच्या इमारतीत शाखा सावनेर, काटोल, कळमेश्वर कामठी व मौदा येथील सुपरविजन सोसायटीचे कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देण्यांत आल्या असून तेथे सुपरविजन सोसायटीची कार्यालय सुरु आहेत. पारशिवनी, रामटेक व उमरेड येथील सुपरविजन सोसा.चे कार्यालयास जागा उपलब्ध करुन देण्यास प्रस्ताव आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावरील सुपरविजन सोसायटीचे बाबतीत एकसुत्रीपणा असावा या दृष्टीने बँकेच्या शाखा इमारतीत जागा रिक्त असल्यास जागेची मागणी करणाऱ्या सोसा.ला

उपलब्ध करून देण्यात यावी. व जागेचा उपयोग करणाऱ्या सुपरविजन सोसायटीने स्वतंत्र मिटर लावून विज बिलाचा भरणा करावा. ग्राम पंचायत किंवा नगरपरिषदेचा कर एकूण बिलाचे १०% भरणा करावा. तसेच त्यांना आवश्यकता व सोयीनुसार काही जुजबी दुरुस्ती बँकेची मान्यता घेवुन स्वखर्चाने करावी. पारशिवनी, रामटेक व उमरेड येथील सुपरविजन सोसा. ने त्यांचे कार्यालयास जागा उपलब्ध करून देण्याकरिता आलेल्या प्रस्तावाप्रमाणे वरील प्रमाणे अटींची पूर्तता करून शाखा पारशिवनी व उमरेड येथील शाखा व्यवस्थापकांचे निवास स्थानाची जागा व शाखा रामटेक येथील चाळीतील सध्या बँकेच्या सेवेतील अधिकारी यांचे उपयोगात असलेले निवासस्थानाची जागा सुपरविजन सोसा.चे कार्यालयास उपलब्ध करून द्यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०(२):- शेती मध्यम मुदती कर्जांतर्गत सबमर्सिबल पंपाकरिता द्यावयाच्या कर्जरकमेत वाढ करण्याबाबत.

ठराव क्रमांक १०(२):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, शेती विकासाकरिता नविन विहिर, इलेक्ट्रीक मोटर, ऑईल इंजीन, पाईप, तुषार संच, ठिंबक सिंच तथा सबमर्सिबल पंप इत्यादि कारणाकरिता नाबार्डने सुचविलेल्या युनिट कॉस्टला मा. संचालक मंडळाचे सभेची मान्यता घेवून ठरविण्यांत ठरविण्यांत आलेल्या रकमेइतका मध्यम मुदती कर्जपुरवठा संस्थेमार्फत केला जातो. बोअरवेल व सबमर्सिबल पंप या संपूर्ण सेटकरिता बँक कर्जपुरवठा करीत होती. बोअर वेल यशस्वी न झाल्यास विमा कंपनीकडे नुकसान भरपाईसाठी प्रकरण सादर करण्यांत यायचे. बोअरवेल यशस्वी न झाल्यामुळे विमा कंपनीकडे नुकसान भरपाईची प्रकरणे वाढू लागली. त्यामुळे विमा कंपनीने बोअर वेलचा विमा उतरविणे बंद केले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी स्वतः बोअरवेल तयार करित असेल आणि पाण्याची उपलब्धता समाधानकारक असेल तर बँक सबमर्सिबल पंप तसेच पूरक साहित्य, पंपाकरिता लागणारा जीआईपाईप याकरिता कर्ज उपलब्ध करून देण्याचे बँकेचे सध्याचे धोरण आहे. त्यानुसार बँक रुपये २७०००.०० प्रति युनिट कर्जपुरवठा करीत आहे. परंतु सबमर्सिबलपंप व इतर पुरक साहित्याच्या बाजारातील वाढलेल्या किंमती पाहता सध्याचा कर्जपुरवठा कमी पडत आहे म्हणून सबमर्सिबल पंप व इतर पुरक साहित्य तसेच पंपाकरिता लागणाऱ्या

जीआय पाईपचे युनिटकरिता करावयाचे कर्जदरांत वाढ करावी असे वाटले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सबमर्सिबल पंपसेट तसेच पुरक साहित्य व पंपाकरिता लागणारा जीआय पाईपचे युनिटकरिता तीन हॉर्सपावर रुपये ४६०००.०० व पांच हॉर्सपावर रुपये ४८०००.०० युनिट कॉस्ट खालीलप्रमाणे ठरविण्यांत येत आहे. ह्या युनिट कॉस्टनुसार सभासदास १५% प्रमाणे गुंतवणुक करावी लागेल. सदर युनिट खरेदी साठी सादर केलेल्या कोटेशनच्या ८५% किंवा युनिट कॉस्टनुसार कर्ज मंजुरी यांत कमी असणाऱ्या मर्यादेपर्यंत कर्ज मंजुर करण्यांत यावे असे ठरले.

| | सबमर्सिबल पंपाचे बाजारभाव | पुरक साहित्य व जीआय. पाईप. | संपूर्ण युनिटचा खर्च. | युनिट कॉस्ट | स्वगुंतव णुक | मंजूर करावयाची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ हॉर्सपॉवर | रु.१८०००/- | रु.४६०००/- | रु.४६०००/- | रु.४६०००/- | रु.६९००.०० | रु.३९१००/- |
| ५ हॉर्सपॉवर | रु.२०७००/- | रु.२८०००/- | रु.४८७००/- | रु.४८०००/- | रु.७२००.०० | रु.४०८००/- |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०(३):- दिनांक १०मे२००१ ला शासनाने काढलेल्या मा. संचालकांचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व प्रवास भत्ता व बैठक भत्ता इत्यादिचे कमाल दराबाबत नियमांचे मसुद्याची माहिती देणे.

ठराव क्रमांक १०(३):- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महा. सहकारी संस्था नियम १९६१चे १०७(अ) प्रमाणे मा. संचालक मंडळाचे सभांना व बँकेशी संबंधित इतर सभांना उपस्थित राहण्यासाठी समितीचे सदस्यांना प्रवास भत्ता, बैठक भत्ता व दैनिक भत्ता निर्धारित दरानुसार देणे सुरू आहे.

मा. संचालकांना बँकेच्या ~~सभा~~ बैठकांना सभांना व संबंधित सभांना उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व बैठक भत्ता इत्यादि मध्ये सुधारणा करून कमाल दर ठरवून नियमांचा मसुदा महाराष्ट्र शासनाने दिनांक १०मे २००१ ला अधिसुचना काढून प्रसिद्ध केला आहे. व त्यावर दिनांक ३१मे २००१ पूर्वी येणाऱ्या हरकती किंवा सुचनांवर विचार करणार आहे. मंजूरीनंतर अध्यादेशाचे तारखेपासून लागु करण्यांत येईल असेही मा. अध्यक्ष यांनी सांगितले. सदर [नियमांचे] मसुद्याबाबत सभेला माहिती देण्यांत आली. दिनांक १०मे २००१ रोजी महाराष्ट्र शासनाने समिती सदस्यांचे प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व बैठक भत्ता बाबत प्रसिद्ध केलेला नियमांचा मसुदा संदर्भात सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक १०(४):- विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरचे वतीने डेन्टल कौन्सिल ऑफ इंडियाला रुपये ४०.०० लाखाची बँक गॅरंटी देण्याबाबत.

ठराव क्रमांक १०(४) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांनी रुपये ४०.०० लाखाची ५ वर्षे मुदतीकरिता बँक गॅरंटी मिळणेसाठी मागणी केली आहे. बँकेने विद्या शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांना यापूर्वी रुपये ४५०.०० लाख मुदती कर्ज व खालील प्रमाणे बँक गॅरंटी मंजूर केली आहे.

अ) मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाचे नांवाने रुपये १००.०० लाखाची ५ वर्षे मुदतीची बँक गॅरंटी १०% मार्जिन राखून.

ब) डेन्टल कौंसिल ऑफ इंडियाला रुपये १२०.०० लाखाचे बँक गॅरन्टीस को-गॅरंटी पंजाब नॅशनल बँकेने खालील प्रमाणे दिली आहे.

१. रुपये ४०.०० लाखाची बँक गॅरंटी दिनांक २८.७.२००१ पर्यंतचे मुदतीसाठी

२. रुपये ८०.०० लाखाची बँक गॅरंटी दिनांक २८.१.२००५ पर्यंतचे मुदतीसाठी

वरील प्रमाणे संपूर्ण कर्जाचे सुरक्षिततेसाठी मंडळाने आपले बँकेस रुपये १०.०५ कोटीची स्थावर मालमत्ता गहाण करून दिली आहे. पंजाब नॅशनल बँकेने वरील प्रमाणे दिलेल्या रुपये ४०.०० लाखाच्या बँक गॅरंटीची दिनांक २८.७.२००१ ला संपली असल्याने रुपये ४०.०० लाखाची बँक गॅरंटी मिळणेकरिता आपले बँकेकडे अर्ज करून १०% रक्कम मार्जिन व २% कमिशनची अट मंडळाने मान्य केली आहे. त्यासाठी विद्या शिक्षण प्रसारक मंडळाने १०% मार्जिनकरिता आपले बँकेत रुपये ४.०० लाख रकमेची मुदत ठेव १ वर्ष मुदतीची ठेवली आहे. व बँकेस पावती सादर केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन विद्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने डेन्टल कौन्सील ऑफ इंडियाला रुपये ४०.०० लाखाची बँक गॅरंटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत देण्यास मंजुरी देण्यात आली. व त्याकरिता आवश्यक असलेला पुढील प्रमाणे इंग्रजीतील ठराव करण्यात येत असे ठरले.

Resolved that -

1). At the request of 'Vidya Shikshan Prasarak Mandal' Nagpur a joint and several Counter Counter Guarantee be issued in favour of Maharashtra State Coop. Bank Ltd., on behalf of Vidya Shikshan Prasark Mandal, Nagpur for Rs 40.00 lakhs (Rs. forty lakhs) only for one year. The Bank guarantee is to be issued by Maharashtra State Coop. Bank in favour of Dental Council of India.

2). The Maharashtra state cooperative Bank Ltd; Mumbai R.O. Nagpur is authorised to debit our current account with them by Rupees Forty lakhs in event of invoking the said guarantee by Dental Council of India.

3). Any two of the following officials are authorised to sign the counter guarantee.

| Sr.No. | Name. | Designation. |
|---|---|---|
| 1) | Shri S.C. Kedar | Chairman |
| 2) | Smt. A.C. Mahajan | Vice-chairman |
| 3) | Shri R.V. Nimje | Director. |
| 4) | Shri A.N. Chaudary | General Manager. |
| 5) | Shri. S.S. Gode | Manager (Officg.) |

4.) Any one of the following persons is authorised to counter sign document issued by the applicant.

| | | |
|---|---|---|
| 1.) | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 2.) | Shri S.S. Gode | Manager (Officg.) |

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १०(५) :- महात्मा गांधीजी यांचे बँकेचे वार्षिक अहवालावरील फोटोबाबत

ठराव क्रमांक १०(५) :- मा॰ अध्यक्ष यांचे परवानगीने चर्चा करतांना मा. श्री.ग. केशहीर म्हणाले की, यावर्षी बँकेचे वार्षिक अहवालाचे मुखपृष्ठावर महात्मा गांधीजींचे चित्र छापल्याने सदर अहवाल नेहमीकरिता स्मरणांत राहील याकरिता बँकेचे वार्षिक अहवालावरील महात्मा गांधीजींचे चित्र मोठे (एनलार्ज) करून मोठे केलेले चित्र फ्रेम करून बँकेचे मा. संचालकांना देण्यात यावे अशी सुचना मांडली. मा. श्री शाहीर यांच्या सुचनेचे मा॰ अध्यक्ष यांनी अभिनंदन केले व महात्मा गांधीजींचे बँकेचे सन २०००-२००१ चे अहवाला वरील चित्र एनलार्ज करून तयार केलेली फ्रेम (फोटो) देण्याऐवजी मोनमेंट देण्यात यावा असे सभेला सुचविले.

यावर चर्चा होऊन महात्मा गांधीजींचा मोनुमेंट बँकेचे मा॰ संचालकांना देण्यात यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७०(ध): रामटेक तालुक्यातील कान्हुरवाही येथे बँकेची नविन शाखा सुरू करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७०(ध):- मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, कान्हुरवाही गट ग्राम पंचायत ता० रामटेकच्या सरपंच यांनी ग्रामसभेचे ठरावासह बँकेची शाखा कान्हुरवाही येथे उघडण्यात यावी याकरिता निवेदन केले आहे. परिसरात कान्हुरवाही हे गांव मोठे असून जवळपास असलेल्या १५-२० खेड्यांमध्ये मध्यभागी असून आठवडी बाजाराचे ठिकाण आहे. या परिसरातील आर्थिक (बँकिंग) व्यवहाराकरिता, विज बिल भरण्याकरिता रामटेक येथील आपले बँकेत यावे लागते. कान्हुरवाही पासून रामटेक १५ किलोमिटर अंतरावर आहे. कान्हुरवाही येथे बँकेची नविन शाखा उघडल्यास तेथील व परिसरातील सधन कास्तकाराकडून लोकांकडून बँकेला मुदती ठेवीच्या स्वरूपांत भरपूर ठेवी मिळतील असा विश्वास ग्रामपंचायतीने अर्जामध्ये नमुद केला आहे. व कान्हुरवाही परिसरात ५ ग्रामपंचायत, २ खाजगी हायस्कुल, १ पतसंस्था दोन सेवा सहकारी संस्था, १५ शाळा (माध्यमिक) (जि०प०च्या), अंदाजे २००० विजेचे कनेक्शन असल्याचे कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन रामटेक तालुक्यातील कान्हुरवाही येथे बँकेची नविन शाखा उघडण्यात यावी असे ठरले. याकरिता परवानगी मिळणेसाठ मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य-पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर झालेल्या चर्चेत मा.श्री.अ.य.गुजर संचालक म्हणाले की पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईच्या विमा कंपनीकडून प्राप्त झालेल्या रकमा सभासदाकडे असलेल्या कर्जवसुलीत परस्पर जमा करण्यात येत आहेत, तथापी विमा कंपनीकडून पिक विमा नुकसान - मिळालेल्या भरपाईच्या रकमा कर्जवसुलीत जमा न करता कास्तकार सभासदांना दिल्यास त्यांना विमा कंपनीकडून पिक विमा नुकसान भरपाईची किती रक्कम मिळाली हे माहित झाले असते व सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये शेतीकामामुळे असलेली अडचण आर्थिक अडचण दुर होण्यास मदतच झाली असती. या दृष्टीने पिक विमा नुकसान भरपाईची

मिळालेली रक्कम शेतकरी सभासदांना (संबंधित) देता येत असल्यास आवश्यक कार्यवाही करित व्हावी. या सुचनेला मा. श्री श्रा. चं. शहाणे संचालक यांनी अनुमोदन दिले. मा. श्री अ. रा. गुप्ता संचालक म्हणाले की, नगरधन सोसायटीचे शेतकरी सभासदांकडून पिक विमा रक्कम घेण्यांत आली. परंतु विमा काढण्यांत आलेला नाही. यावर मा. अध्यक्ष यांनी पिक विमा नुकसान भरपाईबाबत सोसायटीबाबत तपासणी करण्याकरिता सुचना देण्यांत येत आहेत. तसेच नगरधन सोसायटीचे कोणते सभासदाची पिक विमा प्रिमीयम करिता रक्कम घेण्यांत आली. परंतु पिक विमा प्रिमीयम भरला नाही याबाबत चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्यास सांगितले.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सही) सरव्यवस्थापक (सही) अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप बँक लि., नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा शनिवार दिनांक २८.११.२००१ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. त्या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | |
|---|---|
| १. मा.श्री.सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा.सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा.श्री.र.गो.बंग | संचालक |
| ४. मा.श्री.भा.चं.शहाणे | " |
| ५. मा.श्री.अ.रा.गुप्ता | " |
| ६. मा.श्री.व.भा.वांढे | " |
| ७. मा.श्री.अ.य.गुजर | " |
| ८. मा.श्री.चं.ल.कोल्हे | " |
| ९. मा.श्री.सं.लि.चोरे | " |
| १०. मा.श्री.श्रा.ग.धवड | " |
| ११. मा.श्री.वि.रा.हुलके | " |
| १२. मा.श्री.ना.र.जीभकाटे | " |
| १३. मा.श्री.वि.जा.राबुत | " |
| १४. मा.श्री.वि.वि.निमजे | " |
| १५. मा.श्री.ग.के.आहिर | " |
| १६. मा.श्री.मो.वि.निमजे | " |
| १७. मा.श्री.र.व्यं.निमजे | " |
| १८. मा.श्री.ब.भा.तायवाडे | " |
| १९. मा.श्री.मु.भि.पन्नासे | " |
| २०. मा.श्री.अ.शं.धार्मीक | " |
| २१. मा.श्री.व.क.पारडीवनीकर | " |
| २२. मा.श्री.चं.तु.समर्थ | " |
| २३. मा.सौ. रमिलाताई कुंभारे | संचालिका |
| २४. मा.सौ.कु.रा.किंमतकर | " |
| २५. मा.श्री.एल.जी.चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २६. मा.श्री.डी.जी.भड़ाणे | " |
| २७. मा.श्री.एस.एस.गोडे | प्रभारी व्यवस्थापक |

अनुपस्थित.

१. मा.श्री. र.पां. गावंडे संचालक

२. मा.श्री. आ. र. देशमुख "

३. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर

४. मा.श्री. अ.ना. पोरेड्डीवार, प्रतिनिधी, म.रा.सह.बँक मर्या.मुंबई.

५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

६. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग १, सहकारी संस्था (बँक), नागपूर.

७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८. मा. विभागीय अधिकारी म.रा.स.बँक म. विभागीय कार्यालय, नागपूर.

९. मा.श्री. ए.एन. चौधरी, सरव्यवस्थापक.

मा.श्री. र. पां. गावंडे व मा.श्री. आ.र. देशमुख, संचालक सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. यानंतर सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिके वरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २९.९.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक २९.९.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक २९.९.२००१ रोजी झालेल्या सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मा. प्रभारी व्यवस्थापक यांनी सभेला थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- तज्ञ समितीने सन २००२-२००३ हंगामाकरिता शिफारस केलेले पिक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजूर करुन महाराष्ट्र राज्य सह. बँक लिमी. मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे.

ठराव क्रमांक ३ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, व सभेला माहिती

देतांना सांगितले की, सन २००२-०३ च्या हंगामाकरिता पिक कर्ज एकरी दर ठरविण्याकरिता दिनांक २५.१०.२००१ ला तज्ञ समितीची सभा घेण्यांत आली या सभेत बियाणे, औषधी व वाढलेले खताचे भाव, दिवसेंदिवस मजुरीचे दरांत झालेली वाढ, पिक उत्पादनासाठी आधुनिक पध्दतीचा अवलंब तसेच शेतकऱ्यांचा नगदी पिके घेण्यामागील कल, दिवसेंदिवस ओलीताखालील क्षेत्रांत होणारी वाढ या बाबी विचारांत घेवुन नगदी कर्जाचे प्रमाण ७०% व वस्तुरुप कर्जाचे प्रमाण ३०% टक्के करण्याबाबत शिफारस करण्यांत आली.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन तज्ञ समितीने शिफारस केलेल्या सन २००२-२००३च्या हंगामाकरिता पिक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजुर करण्यांत आले. हे दर मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत यावे असे ठरले.

| अ.क्र. | पिकाचे नांव | तज्ञ समितीने शिफारस केलेले दर (सन २००२-२००३) | | | मा. संचालक मंडळाने मंजुर केलेले एकरी दर (सन 2002-2003) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नगदी | वस्तु | एकुण | नगदी | वस्तु | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १] | खरीप हंगाम : | | | | | | |
| अ] | ओलित पीके | | | | | | |
| | १. धान अ.ऊ.हे. | ३१०० | १३०० | ४४०० | ३१०० | १३०० | ४४०० |
| | २. ज्वारी अ.ऊ.हे. | १६०० | ८०० | २४०० | १६०० | ८०० | २४०० |
| | ३. कापूस ओलित | ३१०० | १४०० | ४५०० | ३१०० | १४०० | ४५०० |
| | ४. तुर | १८०० | ८०० | २६०० | १८०० | ८०० | २६०० |
| | ५. मिरची | ३५०० | १५०० | ५००० | ३५०० | १५०० | ५००० |
| | ६. संत्रा प्रति झाड | ४३ | १९ | ६२ | ४३ | १९ | ६२ |
| | ७. केळी | ४९०० | २१०० | ७००० | ४९०० | २१०० | ७००० |
| | ८. भाजीपाला | २००० | ८०० | २८०० | २००० | ८०० | २८०० |
| | ९. ऊस पूर्व हंगाम | ६४०० | २८०० | ९२०० | ६४०० | २८०० | ९२०० |
| | १० ऊस सुरु हंगाम | ५९०० | २५०० | ८४०० | ५९०० | २५०० | ८४०० |
| | ११. ऊस खोडवा | ४९०० | २१०० | ७००० | ४९०० | २१०० | ७००० |
| | १२. चारापिके लुसर्न | १९०० | ८०० | २७०० | १९०० | ८०० | २७०० |
| | १३. चारापिके बरसिम | १५०० | ७०० | २२०० | १५०० | ७०० | २२०० |
| | १४ अद्रक, लसन हळद | १५०० | ७०० | २२०० | १५०० | ७०० | २२०० |
| | १५ पानमळा मशागत | १७०० | ७०० | २४०० | १७०० | ७०० | २४०० |
| ब] | कोरड पिके | | | | | | |
| | १. कापूस | २५०० | १००० | ३५०० | २५०० | १००० | ३५०० |
| | २. धान | १४०० | ६०० | २००० | १४०० | ६०० | २००० |
| | ३. ज्वारी | १६०० | ७०० | २३०० | १६०० | ७०० | २३०० |
| | ४ मिरची | २२०० | १००० | ३२०० | २२०० | १००० | ३२०० |
| | ५. भुईमुंग | २५०० | ११०० | ३६०० | २५०० | ११०० | ३६०० |
| | ६ सोयाबिन | १९०० | ८०० | २७०० | १९०० | ८०० | २७०० |
| | ७. तुर. | १७०० | ७०० | २४०० | १७०० | ७०० | २४०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रब्बी/उन्हाळी | | | | | | |
| १. | गहू अ.उ.दे ओ. | २४०० | १००० | ३४०० | २४०० | १००० | ३४०० |
| २ | गहू अ.उ.दे. को. | १५०० | ६०० | २१०० | १५०० | ६०० | २१०० |
| ३. | चना कोरड | १७०० | ७०० | २४०० | १७०० | ७०० | २४०० |
| ४. | चना कोरड | १५०० | ६०० | २१०० | १५०० | ६०० | २१०० |
| ५. | जवस | १००० | ४०० | १४०० | १००० | ४०० | १४०० |
| ६. | तीळ | ११०० | ५०० | १६०० | ११०० | ५०० | १६०० |
| ७. | करडई/सुर्यफुल | १४०० | ६०० | २००० | १४०० | ६०० | २००० |
| ८. | भुईमुँग उन्हाळी | ३२०० | १४०० | ४६०० | ३२०० | १४०० | ४६०० |
| ९. | सोयाबीन | १९०० | ८०० | २७०० | १९०० | ८०० | २७०० |

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत कर्जवाटप केलेले उद्योजक श्री भागवत शामराव राउत यांचेकडील थकित रकमेच्या कर्ज वसुलीबाबत आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ४ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री भागवत शामराव राउत रा. कोदेगांव द्वारा श्री नारायण घटे मु.पो. सावनेर यांनी बँकेचे सावनेर शाखेतून ट्रक खरेदी करणेकरिता सन १९९५ मध्ये रुपये ४१५८८०/- कर्ज घेतले. त्यांनी सदर कर्जापोटी रुपये २६७५४३/- मुद्दल व रुपये ४३३७४४/- व्याज असे एकुण रुपये ७३०६८७/- कर्जवसुलीत भरले आहे. उद्योजकाने नियमितपणे कर्जपरतफेड न केल्यामुळे थकित कर्जावर दिनांक ३०.९.२००७ पर्यंत रुपये १६०७५/- दंड व्याज आकारण्यांत आले. उद्योजक श्री भागवत शामराव राउत यांचेकडे कर्ज थकित झाल्याने त्यांना थकित असलेली कर्ज वसुली ७ दिवसाचे आंत भरण्यास दिनांक १०.१०.२००७ चे पत्राप्रमाणे कळवून त्याच पत्राद्वारे दिलेल्या अवधीत कर्जपरतफेड न केल्यास कर्जावरील वाहन जप्त करण्यांत येईल असेही कळविले. सदर सुचनेचे उत्तरादाखल कर्जावरील संपूर्ण व्याजांत सवलत दिल्यास दिनांक १५.१०.२००७ पासून दोन महिन्याचे अवधीत संपूर्ण कर्जबाकी परतफेड करण्याची अर्जदाराने तयारी दर्शविली आहे. उद्योजकाकडे दिनांक ३०.९.२००७ अखेर मुद्दल रुपये २०३८३७/- व व्याज रुपये २४०४/- असे एकुण रुपये २०६२४१/- कर्जबाकी आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन उद्योजकाकडे असलेली कर्जबाकी रुपये २०३८३७/- मुद्दल व्याजासह अर्जदाराने घेण्यांत आलेल्या निर्णयाचे तारखेपासून २ महिन्याचे कालावधीत भरणा केल्यास उद्योजकाला दंडव्याजाची

सवलत देण्यांत यावी असे ठरले. कर्जबाकीच्या दिलेल्या अवधीत भरणा न केल्यास कर्जवसुलीसाठी कायदेशिर पुढील कारवाई करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ :- मुदती ठेवींचे तारणावर देण्यांत येणाऱ्या ओव्हरड्राफ्ट धोरणांत सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेत मुदत / पुनर्गुंतवणुक ठेवींचे तारणावर ओव्हर - ड्राफ्ट देण्याचे धोरणानुसार अटी पूर्ण करणाऱ्या ठेवीदारांना ओव्हरड्राफ्ट देण्याची सुविधा आहे. सदर ओव्हरड्राफ्ट सुविधा मुदत / पुनर्गुंतवणुक ठेव ठेवणाऱ्या सर्वच ठेवीदारांना उपलब्ध नसल्याने सध्याचे ओव्हरड्राफ्ट धोरणांत सुधारणा सुचविल्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मुदत ठेव / पुनर्गुंतवणुक ठेवींचे तारणावर ओव्हरड्राफ्ट देण्याचे धोरणांत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

१. मुदती / पुनर्गुंतवणुक ठेव कमीत कमी रुपये १०,०००/- रकमेची कमीत कमी दोन वर्षाकरिता गुंतविलेली असावी.
२. मुदती ठेवींचे तारणावर ८०% पर्यंत ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजुर करता येईल.
३. ओव्हरड्राफ्ट मर्यादेचा कालावधी एक वर्षाचा असावा व दरवर्षी नुतनीकरण आवश्यक राहील.
४. ओव्हरड्राफ्ट रकमेवर मुदती ठेव पावतीवर असलेल्या दरापेक्षा २% अधिक व्याज आकारण्यांत यावे. व व्याज आकारणी तिमाही करणेत यावी.
५. या खात्यावर व्यवहारासाठी चेक बुकची सुविधा उपलब्ध राहील.
६. ठेवीदाराला ओव्हरड्राफ्ट देतेवेळी नामधारी सभासद करून घ्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्रमांक ६ :- चालु वर्षात झालेल्या बँकेचे खरीप पीक कर्ज वाटपाचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, सहकार खात्याचे सुचनेनुसार १९९९ ते २००२ ह्या तीन वर्षाकरिता १९९९-२००० साली तयार करण्यांत

आलेल्या क.म.पत्रकांतील मागील मंजूर मर्यादेचे आधारावर चालू वर्षी कर्जवाटप
केले आहे. क्रेडिट प्लॅनप्रमाणे खरिप व रब्बीचे कर्जवाटपाकरिता रुपये ५३.२५ कोटीचे
उद्दिष्ट आहे. सन २००१-२००२ ह्या वर्षाकरिता ३०.९.२००१ अखेर धान, ज्वारी, भुईमुग,
सोयाबीन, कापूस, मिरची, संत्रा, व इतर पिकाकरिता ५८ संस्थांचे ३१४३० सभासदांना
६५९२८ हेक्टर जमिनीकरिता रुपये ३७.९२ कोटी नगदी व रुपये १३.१२ कोटी वस्तु
रूप असे एकूण रुपये ५१.०४ कोटी कर्जवाटप झाले आहे. मागील वर्षीपेक्षा या वर्षी
रुपये ३.४३ कोटी जास्त कर्जवाटप झाले आहे. मागील महिन्यांत ५८ संस्थांचे
३०७०८ सभासदांना ६५५०८ हेक्टर जमिनीकरिता रुपये ३६.७७ कोटी नगदी व
रुपये १२.७७ कोटी वस्तुरूप असे एकूण रुपये ४९.५४ कोटी कर्जवाटप केले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे ३० सप्टेंबर २००१ अखेर झालेल्या
कर्जवाटपाबाबत देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ७:- माहे सप्टेंबर २००१ अखेर बँकेच्या कर्जवसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ७:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती
देतांना सांगितले की, बँकेची कर्जवसुली समाधानकारक झाली नाही तर
नविन कर्जवाटपावर मर्यादा येतात. तसेच नाबार्ड, राज्य सहकारी बँक या
वित्तीय संस्थाकडून फेरकर्जमर्यादा मिळण्यास अडचणी निर्माण होतात. असे होऊ
नये याकरिता बँकेने कर्जवसुलीकरिता कृती कार्यक्रम तयार करून त्याची अमलबजा
वणी करून कर्जवसुली वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. यावर्षी
३०.९.२००१ अखेर रुपये ५२.०४ कोटी मुद्दलांत व रुपये १२.८८ कोटी व्याजांत
वसुली आली आहे. कर्जवसुलीचे शेकडा प्रमाण ४१.५८% असून मागील वर्षीच्या
३९.१२% कर्जवसुलीचे तुलनेत यावर्षी कर्जवसुलीचे प्रमाण जास्त आहे. असे
असले तरी कर्जवसुली समाधानकारक झाली असे म्हणता येणार नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे सप्टेंबर २००१ अखेर झालेल्या
कर्जवसुलीची देण्यांत आलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ८:- धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थानचे नागपूर येथील
इमारत प्रकल्पासाठी देणगी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८:- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती
देतांना सांगितले की, नागपूर येथे धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध
संस्थानची स्वतंत्र इमारत उभारण्यांत येत आहे. या इमारत बांधकामाकरिता
रुपये ३.५० कोटी एकूण खर्च येणार असल्याचे कळवून मा० ॲडवोकेट -

सुहासराव तिडके, अध्यक्ष, प्रबंध समिती, धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान व अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे यांनी सदर सहकारी प्रबंध संस्थानच्या इमारत बांधकामाचे प्रकल्पासाठी सढळ हाताने किमान रुपये ५.०० लाखाची देणगी पाठविणेकरिता दिनांक ५.१०.२००७ चे पत्रानुसार विनंती केली आहे. यावर मा. श्री. तायवाडे, संचालक व मा. श्री. गुजर संचालक यांनी नागपूर येथे सहकारी प्रबंध संस्थानचे इमारत उभारणीसाठी देणगी देण्यांत यावी असे मत व्यक्त केले. मा. श्री. पन्नासे संचालक यांनी आपली बँक ही राज्याच्या उपराजधानीचे शहरात असल्यामुळे व इमारत सुध्दा नागपूर येथेच उभारणी होत असल्यामुळे इतर जिल्हा बँकांपेक्षा जास्त रकमेची देणगी द्यावी असे मत व्यक्त केले. यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, सदर प्रकल्पाकरिता इतर जिल्हा सहकारी बँकाप्रमाणे आपल्या बँकेने देणगी द्यावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, नागपूरचे इमारत उभारणीकरिता इतर जिल्हा सहकारी बँकाप्रमाणे देणगी देण्यास मंजुरी देण्यात आली. व देणगी देण्याबाबत चे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत आले असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ६ (१) :- खादी ग्रामोद्योग आयोग पुरस्कृत ग्रामिण उद्योगासाठी २५% मार्जीन मनी योजने अंतर्गत कर्ज धोरण मंजुरीबाबत.

ठराव क्रमांक ६(५) :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व विषयावर सविस्तर चर्चा होउन खादी ग्रामोद्योग आयोग पुरस्कृत ग्रामिण उद्योगासाठी २५% मार्जीन योजने अंतर्गत बँकेने घालुन दिलेल्या अटीवर खालीलप्रमाणे कर्ज कर्ज धोरण मंजूर करण्यांत येत आहे.

कर्ज धोरण -

१. सदर योजना ग्रामिण भागांतील शेतकरी उद्योजकांनी चालविण्याच्या उद्योगाकरिता लागु राहील.

२. या योजने अंतर्गत वैयक्तीक लाभधारक कारागिरास प्रकल्पा अंतर्गत रुपये १०.०० लाखा पर्यंत, तर सहकारी विश्वस्त संस्थांना प्रकल्पासाठी रुपये २५.०० लाखा पर्यंत कर्ज मिळू शकेल.

३. सदर योजने अंतर्गत रुपये १०.०० लाखापर्यंतच्या कर्जास २५% अनुदान व पुढे १० ते २५ लाखापर्यंत १०% अनुदान शासनाकडून प्राप्त होईल.

४. या योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थींना प्रकल्प खर्चाच्या १०% तसेच जे लाभार्थी अनुसुचित जाती जमाती महिला, अपंग माजी सैनिक अल्प संख्यांक आहे अशांना प्रकल्प खर्चाच्या ५% स्वगुंतवणुक करावी लागेल.

५. बँकेला सर्वसाधारण लाभार्थीसाठी प्रकल्प खर्चाच्या ६०% तर दुर्बल घटकांतील लाभार्थीसाठी प्रकल्प खर्चाच्या ६५% रकमे इतपत कर्ज द्यावे लागेल.

६. प्रकल्प खर्चाच्या २५% पर्यंत मिळणारी मार्जीन मनी अनुदान रक्कम प्रथमतः बँकेत मुदती ठेवीत जमा करण्यांत येईल. लाभार्थी कर्जाची नियमित परतफेड करीत असल्यास दोन वर्ष मुदतीनंतर ठेवीची रक्कम कर्ज खाती वळती करण्यांत येईल.

वरील प्रमाणे कर्ज धोरण राबविण्याकरिता बँकेच्या घालून दिलेल्या

विशेष अटी.

१. ग्रामीण कारागिर बलुतेदार सहकारी संस्थेची वसुली किमान ~~६०%~~ ५०% असावी. तसेच सदर योजनेतील तरतुदीनुसार वैयक्तिक कारागिरानांही कर्जपुरवठा करण्यात यावा.

२ सदर योजने अंतर्गत दिलेले कर्ज थकबाकी झाल्यास संस्थेच्या बँकेत जमा असलेल्या ठेवी, रिझर्व फंड, इत्यादि सर्व प्रकारच्या ठेवी कर्ज खाती वळती करण्याचा अधिकार बँकेला राहिल. अशा प्रकारचे संमती व अधिकारपत्र संस्थेनी बँकेला करून द्यावे लागेल.

३. कर्ज घेणाऱ्या लाभधारकास स्वतःची अथवा लायक जामीनदाराची कर्ज रकमेच्या पुरेशा किंमतीची स्थायी संपत्ती बँकेच्या तारणांत द्यावी लागेल.

४. वैयक्तिक लाभधारक उद्योजकास मुदतीच्या आंत व्याजासह कर्जफेडीबाबत सभासद, संस्था व बँक असा त्रीस्तरीय करार बँकेला करून द्यावा लागेल.

५. लाभार्थीला कर्ज घेण्यास्तव सादर करावयाचा प्रकल्प हा आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या सक्षमतेचे संबंधीत क्षेत्रातील तज्ञांचे प्रमाणपत्र असलेला प्रकल्प अहवाल सादर करावा लागेल. सादर करण्यात येणारा प्रकल्प अहवाल व कर्ज मागणी अर्ज खादी ग्रामोद्योग बोर्डाचे शिफारशीसह बँकेला सादर करावा लागेल.

६. कर्जा संबंधीच्या बँकेच्या अटी व नियम सभासद, संस्था व खादी बोर्डाला मान्य असल्याचे कबुलीपत्र बँकेला सादर करावे लागेल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ (२) :- नागपूर शहरांत बँकेच्या नविन शाखा उघडणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९(२) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगांत बँकेच्या ठेवीदार व कर्जदार ग्राहक संख्येत जास्तीत जास्त वाढ करुन बँकेच्या नफ्यांत भर टाकण्याचे दृष्टीने बँकेच्या शाखा विस्तारास महत्व प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने नागपूर शहरांत फ्रेंडस कॉलनी, काटोल रोड, नागपूर (पश्चिम नागपूर) व विनोबा भावे नगर (उत्तर नागपूर) या ठिकाणी बँकेच्या नविन शाखा उघडण्याचा बँकेचा विचार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन फ्रेंडस कॉलनी, काटोल रोड, नागपूर व विनोबा भावे नगर, नागपूर या ठिकाणी बँकेच्या नविन शाखा नागपूर शहरांत उघडणेकरिता सहकार खात्याची परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

---

विषय क्रमांक ९(३) :- बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ अंतर्गत पुढील आदेशापर्यंत वसुलीचे अधिकार मिळणेकरिता मा० विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ९(३) :- मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, थकित कर्जाचे वसुलीसाठी बँकेचे अधिकारी यांना वसुलीची कार्यवाही करणेकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे दिनांक २१ मार्च २००० चे पत्राप्रमाणे कालमर्यादा न घालता वसुलीचे अधिकार मिळणेबाबत मा० विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकित कर्जाचे वसुलीसाठी मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा. पुणे १ यांचे दिनांक २१ मार्च २००० चे पत्राप्रमाणे (देण्यात येणाऱ्या अधिकाराबाबत) कालमर्यादा न घालता खालील अधिकाऱ्यास त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे १५६ (१) (अ)(ब)(क), महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे कलम ८ (एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३), (५), (६), (७), (९), (१०), (११) (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२), (१३), (१५), (१७)(१८) व (२०) तसेच कलमा

व १३७नुसार खालील अधिकाऱ्यास अधिकार प्रदान होणेबाबत मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावी लागेल.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | श्री. बी. सी. खीराळे निरिक्षक | उमरेड | नागपूर जिल्हा. |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

मा० अध्यक्ष यांचे परवानगीने चर्चा करतांना दिनांक ६ जून २००१ रोजीचे सभेत ठरल्याप्रमाणे स्टॉफींग पॅटर्न तयार करुन ४८३ जागांवर कर्मचारी नियुक्तीकरिता प्रस्ताव तयार करण्यांत आला आहे. परंतु मा० सहकार आयुक्तां कडे कर्मचारी नियुक्तीसाठी परवानगी मागतांना प्रस्तावानुसार तुर्तास लिपीकांची नियुक्ती करणेसाठी परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे तथापी बँकेतील सेवानिवृत्त होणारे कर्मचारी, बँकेत वाढलेला कामाचा व्याप, मिळालेल्या परवानगीप्रमाणे नविन शाखा उघडणे ह्या बाबी विचारांत घेता संपूर्ण ४८३ जागावरही कर्मचारी नियुक्तीस परवानगी मिळणेसाठी मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कडे विनंती करणेत यावी असे विचार मा० संचालकांनी व्यक्त केले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

[signature] [signature]

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को.ऑप. बँक लि; नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक १५.०१.२००२ रोजी दुपारी १.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. | मा. श्री. र. गो. बंग | " |
| ५. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ६. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ७. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ८. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ९. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| १०. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ११. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १२. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १३. | मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १४. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १५. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १६. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १७. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. | मा. श्री. ब. आ. तायवाडे | " |
| १९. | मा. श्री. मु. मि. पन्नासे | " |
| २०. | मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| २१. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २२. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २३. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २४. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २५. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. चं. ल. कोल्हे | संचालक |

२. मा.श्री. वि.आ.राऊत. संचालक

३. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर

४. मा.श्री. अ.ना.पोरेड्डीवार, प्रतिनिधी, म.रा.स.बँक म.मुंबई.

५. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

६. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह.संस्था (बँक), नागपूर.

७. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८. विभागीय अधिकारी, म.रा.स.बँक लि., विभागीय कार्यालय, नागपूर.

९. श्री. एल.जी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी

१०. श्री. व्हि. जी. शहाणे, कर्मचारी प्रतिनिधी.

मा.श्री. चं.ल. कोल्हे व मा.श्री. वि.आ. राऊत, संचालक सभेला उपस्थित नसल्याने त्यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभेला उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून नविन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या व विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

Seen
[illegible]
23/1/12

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक २८.११.२००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने ठराव क्रमांक ९(१) वर चर्चा करतांना श्री. र.गो. बंग संचालक यांनी खादी ग्रामोद्योग आयोग पुरस्कृत ग्रामीण उद्योगासाठी २५% मार्जीन योजनेअंतर्गत कर्ज धोरण राबविणेकरिता बँकेने घातलेली वसुलीची अट शिथिल करून किमान ५% असावी अशी दुरुस्ती सुचविली.

विषयावर चर्चा होवुन मागील दिनांक २८.११.२००७ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्रमांक ९(१) मध्ये "बलुतेदार सहकारी संस्थामार्फत राबविण्याकरिता खादी ग्रामोद्योग आयोग पुरस्कृत ग्रामीण उद्योगासाठी २५% मार्जीन योजनेअंतर्गत कर्जधोरण राबविणेकरिता बँकेने घातलेली ४०% वसुलीची अट शिथील करून ग्रामीण कारागीर बलुतेदार सहकारी संस्थेमार्फत होणाऱ्या कर्जपुरवठ्यासाठी किमान वसुली ५% असावी अशी दुरुस्ती घेण्यांत यावी. तसेच सदर योजनेतील तरतुदीनुसार वैयक्तीक कारागिरांनाही कर्जपुरवठा करण्यांत यावा." अशा दुरुस्तीसह मागील दिनांक २८.११.२००७ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

---

विषय क्रमांक २ :- मागिल सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मागिल दिनांक २८.११.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद सभेत घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ :- मे. मुरली अॅग्रो प्रोडक्टस लि., नागपूरचे मौजा वडोदा येथील न्युज प्रिंट पेपर युनिटकरिता कच्चा माल आयात करण्यासाठी राज्य सहकारी बँकेमार्फत एल० सी० सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक ८.१.२००२ रोजी घेण्यांत आलेला सर्क्युलेटींग ठराव कायम करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मे. मुरली अॅग्रो प्रोडक्टस लि., नागपूर यांचे मौजा वडोदा तालुका कामठी जि० नागपूर येथील न्युज प्रिंट पेपर युनिटकरिता विदेशातून कच्चा माल (वेस्ट पेपर) आयात करण्यासाठी रुपये ३००.०० लाख पत पत्र (एल० सी०) मर्यादा दिनांक २१.१२.२००१ चे मा० कर्ज उपसमिती चे सभेत मंजुर झालेली आहे. या अनुषंगाने पतपत्र (एल० सी०) मर्यादा ~~दिनांक २१.१२.२००१~~ मंजुरीबाबतचे पत्र क्रमांक कर्जविभाग/बिगरशेतकी/२००१-२००२/६६८७ दिनांक ५.१.२००२ नुसार कंपनीने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. या मर्यादेअंतर्गत कंपनीला वेळोवेळी विदेशातून कच्चा माल (वेस्ट पेपर) आयात करावा लागणार आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई येथून कंपनीला वेळोवेळी एल० सी० मंजूर करुन घ्यावयाची असल्याने एल० सी० द्वारे मागविलेल्या मालाची ११० टक्के प्रमाणे येणारी रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याची हमी आपल्या बँकेला द्यावी लागेल. व याकरिता महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., मुंबई येथील आपल्या बँकेच्या चालू ठेव खात्यातून एल० सी० पोटी रक्कम अदा करण्याबाबत राज्य सहकारी बँकेला अधिकार द्यावे लागतील व याकरिता आपले बँकेच्या माननीय संचालक मंडळाने ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

कंपनीची एल० सी० मंजुरीबाबत तातडीची गरज विचारात घेवुन बँकेच्या मा० संचालक मंडळाने दिनांक ८.१.२००२ रोजी घेतलेल्या खालील प्रमाणे सर्क्युलेटींग ठरावास दुरुस्तीसह कायम करण्यांत येत आहे.

Resolved that.

1) At the request of M/s Murli Agro Products Ltd., Nagpur and interms of sanction accorded by Loan Subcommittee of the Bank in its meeting held on 29.12.2001 joint and several guarantee be issued infavour of The Maharashtra State Coop. Bank Ltd., Mumbai against the documentary credit to be issued by the later upto Rs. Three hundred lacs i.e. Rs. Three crores only equivalent to letters of credit establish by them.

2) The Maharashtra State Coop. Bank Ltd. Mumbai is authorised to debit Current Account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount charges and interest if any incurred under the documentary credit to be established from time to time within above said limit.

3) Any two of the following persons are authorised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr. No. | Name | Designation. |
|---|---|---|
| 1. | Shri B.C. Shahane | Director |
| 2. | Shri R.V. Nimje | Director |
| 3. | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 4. | Shri S.S. Gode | Manager (officg.) |

4) Any one of the following persons is authorised to counter sign documents issued by the applicant for credit.

| Sr. No. | Name | Designation. |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. Chaudhary | General Manager |
| 2. | Shri S.S. Gode. | Manager (officg.) |
| 3. | Shri S.B. Nikam | Chief officer (officg.) |

ठराव सर्वानुमते मंजुर.

[signature] 14/6/02

---

विषय क्रमांक ४:- निवृत्ती वेतन धारकांना मंजुर करावयाचे कर्ज धोरणाबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ४:- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर

च्या होउन शासकीय, निमशासकीय व अन्य प्रतिष्ठानातून सेवानिवृत्त होउन निवृत्ती आपले बँकेचे शाखांमधून घेतात त्यांना औषधोपचार किंवा अन्य घरगुती कारणाकरिता बँकेनी त्यांच्या परतफेडीचे क्षमते-नुसार कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता खालील प्रमाणे कर्ज धोरणास मान्यता देण्यांत येत आहे.

१) ज्यांचे निवृत्ती वेतन खाते आपल्या बँकेत आहे अशा निवृत्ती वेतन धारकांकरिताच ही योजना लागू राहील. निवृत्त कर्मचाऱ्यांचा वारस निवृत्त वेतनधारक असल्यास त्याला या योजने अंतर्गत लाभ घेता येणार नाही.

२) निवृत्ती वेतनधारकास मिळणाऱ्या निव्वळ वेतनाच्या (बँकेत जमा होणाऱ्या रकमेच्या) सहा पट किंवा जास्तीत जास्त रुपये ३०,०००/- यामध्ये जी कमी असेल त्या रकमेपर्यंत कर्ज उपलब्ध करून देता येईल.

३) या कर्जाची परतफेड व्याजासह २४ मासीक हप्त्यांत करावी लागेल. या कर्जाचा व्याजदर दरसाल दरशेकडा १५ राहील.

४) निवृत्ती वेतनधारकाचे वय ७० वर्षाच्या वर नसावे व तो नागपूर जिल्ह्याचा कायम रहिवासी असावा.

५) सदर कर्ज अंतर्गत अर्जदारास कुटुंबातील पत्नीची, मुलांची, मुलींची भावाची यांची जमानत द्यावी लागेल. तसेच अर्जदाराचे नांवे असलेल्या संपत्तीचे विवरण बँकेला सादर करावे लागेल.

६) सदर कर्जाकरिता कर्ज घेणाऱ्याच्या पेन्शन पेमेंट ऑर्डरची झेरॉक्स प्रत अर्जासोबत सादर करावी लागेल.

७) सदर कर्जाची परतफेड पेंशन खात्यामधून दरमहा व्याजासह कपात करण्यात येईल. ह्याकरिता पेंशन धारकास तसे संमतीपत्र स्टँप पेपरवर बँकेला करून द्यावे लागेल.

८) वरील प्रमुख बाबी व्यतिरिक्त बँकेच्या कर्ज विषयक नेहमीच्या अटी याही बाबतीत लागू राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ५:- बँकेच्या तारणातील जप्त केलेले वाहन लिलावाद्वारे विक्रयांत येणाऱ्या वाहनाचे खरेदीकरिता अस्तित्वांत असलेल्या सध्याच्या कर्ज धोरणांत बदल करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, प्रवासी बस, ट्रक, मिनी ट्रक, ट्रॅक्टर जीप इत्यादि